www.lokrakshanay.com

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

लोकरक्षणाय

• LOKRAKSHANAY • RNI TC NO. MAHBIL10469

•Editor- Rakesh Shankar Gore •Daily •Thane •Volume-01, Issue-210 • Thursday, 04 January 2024 •Pages-04 •Rs.2/-

अनमोल विचार

"मेहनत नावाचा मित्र सोबत असला की अपयश नावाच्या शत्रूची भीती वाटत नाही."

लक्षवेधी

नाद खुळा... म्हणून झोमॅटो बॉय थेट घोड्यावरुन ग्राहकाच्या दारात

हैदराबाद : देशभरातील ट्रकचालकांनी बेमुदत संप पुकारल्याने पेट्रोल पंपावर इंधनाचा साठा कमी उपलब्ध झाला. तर, अनेक ठिकाणी पेट्रोल पंप बंद राहणार असल्याची अफवा पसरल्याने बहुतांश पेट्रोल पंपावर वाहनचालकांनी मोठी गर्दी केली होती. दुचाकी आणि चारचाकी वाहनचालकांनी पेट्रोल पंपावर रांगाच रांगा लावल्या होत्या. यादरम्यान, ऑनलाईन ऑर्डर पाठवणाऱ्या डिलीव्हरी बॉयची चांगलीच गोची झाली. ग्राहकांपर्यंत वेळेत ऑर्डर पोहोचवण्यासाठी त्यांना तारेवरची कसरत करावी लागली. यावेळी, एका झोमॅटो बॉयने चक्क घोड्यावर स्वार होऊन डिलिव्हरी पोहोचवली.

काँग्रेस आणि डाव्यांना लुटण्याचे स्वातंत्र्य हवे; पीएम मोदींचा इंडिया आघाडीवर घणाघात

नवी दिल्ली : येत्या काही महिन्यात लोकसभा निवडणुका होणार आहेत. यासाठी सर्वच पक्ष तयारीला लागले आहेत. भाजपचे दक्षिण भारतावर विशेष लक्ष आहे. याच पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी दक्षिण दौऱ्यावर आहेत. दरम्यान, बुधवारी केरळमधून पीएम मोदींनी इंडिया आघाडीवर जोरदार हल्लाबोल केला. केरळच्या त्रिशूरमध्ये पीएम मोदी म्हणाले की, 'काँग्रेस आणि डाव्यांनी केरळची लूट केली. केरळमध्ये डावे आणि काँग्रेस दीर्घकाळापासून सत्ताधारी आणि विरोधक असल्याचे भासवता. हे नावाचे दोन पक्ष आहेत. भ्रष्टाचार असो, गुन्हेगारी असो किंवा घराणेशाही असो, हे दोघे मिळून सर्वकाही करतात. आता इंडी अलायन्स स्थापन करुन त्यांनी जाहीर केले की, त्यांच्या विचारधारा आणि धोरणांमध्ये कोणताही फरक नाही.'

'यांनी कुस्तीची वाट लावली', आता बजरंग, विनेश आणि साक्षीविरोधात जंतर-मंतरवर उतरले कुस्तीपटू

नवी दिल्ली : गेल्या काही महिन्यांपासून भारतीयकुस्ती महासंघ हा वादाचं केंद्र ठरला आहे. दरम्यान, भारतीयकुस्ती महासंघाविरोधात आंदोलन करत असलेले कुस्तीपटू बजरंग पूनिया, विनेश फोगाट आणि साक्षी मलिक यांच्याविरोधात आता ज्युनियर कुस्तीपटूंनी छड्डू ठोकला आहे. शेकडो ज्युनियर कुस्तीपटू हे जंतर-मंतरवर जमा झाले असून, एक महत्त्वाचं वर्ष वाया गेल्याने त्यांनी या वरिष्ठ खेळाडूंविरोधात आंदोलन केले. भारतीय कुस्तीमध्ये सुरू असलेल्या वादादरम्यान, आज ज्युनियर कुस्तीपटू मोठ्या संख्येने जमा झाले. तसेच कारकिर्दीमधील एक महत्त्वाचं वर्ष वाया गेल्याने त्यांनी त्यासाठी बजरंग पूनिया, साक्षी मलिक आणि विनेश फोगाट यांना दोषी ठरवले. उत्तर प्रदेश, हरियाणा आणि दिल्लीतील विविध भागातून बसमध्ये बसून हे कुस्तीपटू जंतर मंतर येथे आले होते.

अपघात रोखण्यासाठी उत्तर प्रदेश सरकारने उचलले कडक पाऊल; 'थेट पालकांनाच होणार शिक्षा'

लखनौ – अलिकडे शाळेत शिकणारी मुलेही स्कुटी अथवा तत्सम वाहनाने शाळेत जाताना दिसत असतात. त्यांच्याकडे वाहन चालवण्यासाठी आवश्यक असलेला परवानाही नसतो. तरीही ती बेजबाबदारपणे वाहने चालवत असतात. काहीवेळा एकाच वाहनावर तीन तीन जण बसलेले असतात. त्याहीपुढे म्हणजे धोका पत्करत विविध प्रकारची स्टंटबाजी करत वाहन चालवण्याचेही फॅड निर्माण झाले आहे. अलिकडेच प्रसिध्द झालेल्या अहवालानुसार रस्ते अपघातात मरण पावलेल्यांमध्ये १८ पेक्षा कमी वय असणाऱ्या मुलांची संख्या अधिक असल्याचे आढळून आले आहे व त्यात मुलींचाही समावेश आहे. या प्रकाराला आळा घालण्यासाठी अर्थात असले अपघात रोखण्यासाठी आता उत्तर प्रदेश सरकारने ठोस पाउले उचलली आहेत.

अयोध्येला जाणाऱ्या लोकांना सरकारने कडक सुरक्षा दिली पाहिजे, अन्यथा.. काँग्रेस नेत्याने व्यक्त केली शंका

नवी दिल्ली – अयोध्येत २२ जानेवारी रोजी होणारा प्राणप्रतिष्ठा सोहळा हा एक राजकीय कार्यक्रम असल्याची टीका करतानाच अयोध्येत गोध्रा कांडसारखी घटना होण्याची शंकाही काँग्रेस नेते बी. के. हरिप्रसाद यांनी व्यक्त केली आहे. हरिप्रसाद म्हणाले की राम मंदिराचे उदघाटन हा काही धार्मिक कार्यक्रम नाही तर तो एक राजकीय कार्यक्रम आहे. तो धार्मिक कार्यक्रम असता तर आम्ही लोकही त्यात सहभागी झालो असतो. धार्मिक कार्यक्रम असता तर गुरू मंडळीही त्यात सहभागी झाली असती.

धर्माच्या आधारावर केलेला सीएए कायदा घटनाविरोधी'; ओवेसी यांची फडणवीसांवर टीका

नवी दिल्ली – लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर नागरिकत्व दुरूस्ती कायद्यावरून देशातील राजकारण तापत चालले आहे. आता एमआयएम पक्षाचे नेते खासदार असदुद्दीन ओवेसी यांनीही हा कायदा अर्थात सीएए धर्माच्या आधारावर करण्यात आला असून, तो घटनाविरोधी आहे आणि कायद्याचे उल्लंघन करणारा असल्याची प्रतिक्रिया दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच आता देशाच्या संदर्भात त्यांचे धोरण काय आहे ते सांगावे अशी मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान, ६ डिसेंबर १९९२ रोजी कारसेवकांनी जेंव्हा बाबरी मशिद पाडली त्यावेळी आपण तेथे उपस्थित होतो.

गोव्यात आयकर विभागाकडून पब, हॉटेल्स आणि उपाहारगृहे यांवर धाडी

पणजी : नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर गोव्यात होणारी पर्यटकांची गर्दी आणि त्यामुळे येथील हॉटेल आस्थापने, पब, उपाहारगृहे यांमध्ये होणारी उलाढाल लक्षात घेऊन आयकर विभागाने गोव्यातील पब, हॉटेल्स आणि रेस्टॉरंट आदींवर धाडी घातल्या आहेत. बेंगळुरूहून आयकर विभागाचे अधिकारी गोव्यात आले असून त्यांनी १ जानेवारीला सायंकाळपासून एकाच वेळी एका मोठ्या आस्थापनाच्या ५ ते ७ शाखांवर धाडी घातल्या. गोव्यात कळंगुट, वागातोर, बागा, मोरजी, हरमल, कांदोळी, कोलवा, बेतालभाटी या समुद्रकिनारी भागांतील हॉटेल, पब, रेस्टॉरंट यांमध्ये मोठ्या प्रमाणात उलाढाल होते.

'मुंबई-गोवा महामार्गाचे काम ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत पूर्ण करा, अन्यथा अवमान कारवाई होणार'

उच्च न्यायालयाचे निर्देश

मुंबई-गोवा एनएच-६६ हा महामार्ग...

मुंबई-गोवा एनएच-६६ या महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम रखडले असून महामार्गावर मोठ्या प्रमाणात खड्ड्यांचे साम्राज्य असल्याचा दावा करणारी जनहित याचिका कोकणस्थित वकिलाने दाखल केली होती. त्यावर, २०२२ अखेरीस या महामार्गाचे काम पूर्ण करण्याचे आश्वासन राज्य सरकार आणि एनएचएने न्यायालयाला दिले होते. त्यामुळे, न्यायालयाने याचिका निकाली काढली होती. त्यानंतरही हे काम पूर्ण झाले नाही. त्यामुळे, याचिकाकर्त्याने या प्रकरणी अवमान याचिका केली होती. न्यायालयाने दिलेल्या आदेशांची पूर्तता न केल्यामुळे याचिकाकर्त्यांना वारंवार न्यायालयात याचिका करावी लागत असल्याची टिपण्णी करून याचिकाकर्त्यांना झालेल्या त्रासासाठी ५० हजार रुपये देण्याचे आदेश याआधी न्यायालयाने केंद्र आणि राज्य सरकारला दिले होते.

■मुंबई । यश सावंत,

गेल्या १३ वर्षांपासून रखडलेल्या मुंबई गोवा महामार्गाच्या चौपदीकरणाचे कामासाठी आणखी एक वर्षाचा कालावधी लागणार असल्याबाबत उच्च न्यायालयाने बुधवारी नाराजी व्यक्त केली. त्याचवेळी, या महामागार्चे काम पूर्ण करण्यासाठी न्यायालयाने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचए) आणि राज्य सरकारला डिसेंबर अखेरीपर्यंतची मुदत देऊन ही शेवटची संधी असल्याचे बजावले. डिसेंबर अखेरीपर्यंत या महामागार्चे काम पूर्ण करण्यात दोन्ही यंत्रणा अपयशी ठरल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाईल व त्यासाठी संबंधितांवर अवमान कारवाई केली जाईल, असा इशाराही मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने एनएचए आणि राज्य सरकारला दिला. त्याचवेळी, या प्रकरणी दाखल केलेली जनहित याचिका आणि अवमान याचिका निकाली काढली.

महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम २०११ मध्ये हाती घेण्यात आले. हे काम डिसेंबर २०२० मध्ये पूर्ण करण्याची हमी दोन्ही यंत्रणांनी २०१७ मध्ये दिली होती. तथापि, काम पूर्ण करण्याचे आश्वासन देऊन आणि न्यायालयाकडूनही वारंवार त्यासाठी संधी देऊनही महामार्गाच्या चौपदीकरणाचे काम पूर्ण झालेले नाही याकडे याचिकाकर्त्यांनी न्यायालयाचे लक्ष वेधले. आता हे काम डिसेंबर २०२४ पर्यंत करण्याची नवी हमी एनएचए आणि राज्य सरकारकडून देण्यात येत आहे. केवळ हमी देण्याशिवाय दोन्ही यंत्रणांनी काहीच केले नाही, असेही याचिकाकर्त्यांनी न्यायालयाला सांगण्याचा प्रयत्न केला. दुसरीकडे, दहा टप्प्यांत या महामागार्चे काम केले जात असून पहिले दोन टप्प एनएचएतर्फे, तर उर्वरित टप्प्यांचे काम राज्य सरकारकडून केले जात आहे. संपूर्ण महामागार्चे काम डिसेंबरअखेरीपर्यंत करण्याचे आश्वासनही एनएचएतर्फे वरिष्ठ वकील केविक सेटलवाड यांनी न्यायालयाला दिले. तर, दहा भागांपैकी तीन भागांचे काम पूर्ण झाले असून उर्वरित भागांचेही काम वर्षाअखेरीस पूर्ण केले जाईल, असे सरकारी वकील प्रियभूषण काकडे यांनीही न्यायालयाला सांगितले.

मुख्य न्यायमूर्ती उपाध्याय यांनी मात्र दोन्ही यंत्रणांच्या दाव्यांबाबत नाराजी व्यक्त केली. प्रकल्पाचे काम सुरू होऊन १३ वर्षे उलटली आहेत. त्यानंतरही महामार्गाच्या चौपदीकरणाचे आणि दुरुस्तीची कामे पूर्ण झालेली नाहीत. अशा प्रकल्पांमध्ये होणारा विलंब आणि त्यामुळे वाढत जाणारा बांधकाम खर्चाचा भार जनतेला आणि सरकारी तिजोरीलाच सोसावा लागतो, अशा शब्दांत न्यायालयाने दोन्ही यंत्रणांच्या निष्क्रियेवर ताशेरे ओढले. अमूक कालावधीत महामागार्चे काम पूर्ण करण्याचे आश्वासन सरकार आणि एनएचएआयकडून दिले गेले. प्रत्यक्षात त्याची पूर्तता केलीच गेली नाही. त्यामुळे, यापुढे दिलेल्या मुदतीत महामागार्चे काम पूर्ण करण्यात विलंब झाल्यास तो न्यायालयाचा अवमान केल्यासारखे असेल आणि न्यायालय त्याची गंभीर दखल घेईल, असा इशारा न्यायालयाने दिला.

न्यायालयाची मिश्किल टिप्पणी

महामार्गाचे काम ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत पूर्ण होईल असे आश्वासन सरकार आणि एनएचएआयने दिल्यानंतर, १ जानेवारी २०२५ रोजी राज्य सरकारने व्होल्वो बस अथवा लिमोझिनने आम्हा सगळ्यांना याच महामागार्ने गोव्याला घेऊन जावे, अशी मिश्किल टिप्पणी मुख्य न्यायमूर्तींनी केली. त्यांच्या या टिप्पणीवर न्यायदालनात एकच हशा पिकला.

सावित्रीबाई फुले यांच्या जन्मभूमीत भव्य स्मारक उभारणार, १० एकर जमीन खरेदी,१०० कोटींचा खर्च करणार: एकनाथ शिंदे

■सातारा। सचिन कदम,

थोर समाजसुधारक, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नायगाव या जन्मगावी लोकांनी येऊन सामाजिक परिवर्तनासाठी ऊर्जा घ्यावी. यासाठी दहा एकर जागा शासन खरेदी करेल आणि त्यावर शंभर कोटी रुपये निधी खर्चून भव्य स्मारक उभारेल. सावित्रीबाई फुले यांचे कर्तुत्व, त्याग, योगदानाची माहिती समाजातील प्रत्येक घटकाला व्हावी, यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न शील राहील, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

सावित्रीबाई फुले यांचा १९३ वा जयंती सोहळा महाराष्ट्र शासन आणि सातारा जिल्हा परिषदेतर्फे नायगाव (ता. खंडाळा) येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत साजरा झाला. यावेळी अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ, उत्पादन शुल्कमंत्री आणि पालकमंत्री, सातारा व ठाणे जिल्हा शंभूराज देसाई, गृहनिर्माण, इतर मागास व बहुजन कल्याणमंत्री अतुल सावे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर, माजी मंत्री महादेव जानकर, नरेंद्र पाटील, आ. मकरंद पाटील, आ. जयकुमार गोरे, आ. महेश शिंदे, पुरुषोत्तम जाधव आदी उपस्थित होते. महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले देशाला लाभलेले वरदान आहेत. स्त्री स्वातंत्र्य हा शब्दही माहीत नसलेल्या काळात त्यांनी स्त्री शिक्षणाची क्रांती केली. समाजाला जगण्याची दिशा दिली. त्यांच्यासमोर नतमस्तक झाल्याने सामाजिक कार्यासाठी ऊर्जा मिळते. माज्यासाठी ते ऊजार्दायी आहे, अशा शब्दात सावित्रीबाई फुले यांना मुख्यमंत्री शिंदे यांनी अभिवादन केले.

'महाराष्ट्राची ओळख पुसून टाकण्याचा डाव, आता महानंद प्रकल्प गुजरातला हलवण्याची तयारी'

■मुंबई । विशाल कारंडे,

महानंदा डेअरी गुजरातला नेण्याचा डाव असल्याचा आरोप शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. महानंदा ही महाराष्ट्राची ओळख आहे, ती ओळख पुसून टाकली जातेय यामागे कोण आहे? महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना हा भ्रष्टाचार घोटाळा दिसून येत नाही का...? असा सवाल विचारत महानंद नेण्याचा प्रयत्न केल्यास शिवसेना गप्प बसणार नाही असा इशारा राऊतांनी दिलाय. राज्यातील प्रमुख उद्योग आणि व्यवसाय गुजरातला हलवल्यानंतर आता महाराष्ट्राचा प्रमुख महानंद डेअरी प्रकल्प राष्ट्रीय डेअरी डेव्हलपर बोर्डाच्या हवाली करून गुजरातच्या अमूल डेअरीत विलीन करण्याचा डाव असल्याच आरोप संजय राऊत यांनी केला आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी दुग्ध महासंघाची आर्थिक स्थिती खराब असल्याचा हवाला देत महानंद दूध प्रकल्प राष्ट्रीय डेअरी विकास बोर्डाकडे देण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप केला जात आहे. एनडीबीबीकडे प्रकल्प सोपवण्याआधी महानंदतल्या कर्मचाऱ्यांना कामावरुन काढलं जाईल, असा आरोपही करण्यात आलाय. महानंद दूध प्रकल्वासाठी सध्यस्थितीत जवळपास 940 कर्मचारी काम करतात. इतक्या कर्मचाऱ्यांचा वेतनाचा आर्थिक भार वाचवण्यासाठी एनडीडीबीकडून जवळपास 450 कर्मचाऱ्यांची कटोती केली जाईल असंही सांगितलं जात आहे.

जितेंद्र आव्हाडांच्या घरासमोर आरतीचा प्रयत्न; आव्हाडांची अजित पवारांवर शेलक्या शब्दात टीका

■ ठाणे। अनिकेत भंकाळ,

शिर्डीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या पदाधिकाऱ्यांच्या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना आमदार जितेंद्र आव्हाड यांनी श्रीरामाबद्दल केलेल्या एका वादग्रस्त विधानावरुन अजित पवार गट आक्रमक झाल्याचा पहायला मिळाला.

या वक्तव्याविरोधात अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी आव्हाडांच्या घरासमोर जय श्रीरामच्या घोषणा देत आरती करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, या घटनेनंतर जितेंद्र आव्हाड यांनी अजित पवारांवर शेलक्या शब्दात टीका केली. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वर पोस्ट करत आव्हाड म्हणाले की, माज्या घरावर आता अजित पवार यांच्या चार समर्थकांनी आरती करण्याचा प्रयत्न केला. मोजून चारच जण होते. श्री रामाचा इतिहास माहित नसलेल्या औलादींना श्री रामाचा इतिहास समजून सांगावा लागेल. श्री रामाने वनवास केवळएवढ्याचसाठी स्वीकारला होता की, त्यांच्या आईवडिलांमध्ये जे आपापसात ठरले होते, त्यामुळे भरत यांना म्हणजेच आपल्या बंधूला सिंहासन देण्यासाठी चौदा वर्षे वनवास भोगला. पण, सम्राट भरत यांनी श्री रामाच्या पादुका सिंहासनावर ठेवून राज्यकारभार केला. इथे आताच्या यांच्या इतिहासामध्ये यांच्या बापाने आपल्या काकाला म्हणजेच बापाला घराच्या बाहेर ढकलून वनवासाला पाठवायला निघालेत.

नवी मुंबईमधील १२९ वीजचोरांवर गुन्हे दाखल

■नवी मुंबई । भावना जैन,

घणसोलीमध्ये वीजगळती मोठ्या प्रमाणात होत असल्याचे निदर्शनास आले होते. महावितरण अधिकाऱ्यांनी वीजचोरीविरोधात विशेष मोहीम राबविली. १७५ प्रकरणांमध्ये ९० लाख रुपयांची वीजचोरी उघड झाली आहे. या प्रकरणी १२९ जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. वीजचोरीला आळा घालण्यासाठी भांडूप परिमंडळचे मुख्य अभियंता सुनिल काकडे यांनी मोहीम राबविण्याच्या सूचना प्रशासनास दिल्या होत्या.

वाशी मंडळचे अधीक्षक अभियंता सिंहाजीराव गायकवाड यांनी वाशी व नेरूळविभागाच्या माध्यमातून संयुक्त मोहीम राबविली होती. कलम १३५ अंतर्गत १४६ प्रकरणे उघडकीस आणली असून ७७ लाख रुपयांची वीजचोरी केल्याचे निदर्शनास आले. कलम १२६ अंतर्गत २६ प्रकरणे उघकीस आणली असून १२ लाख ९५ हजार रुपयांची वीजचोरी उघडकीस आणली. ग्राहकांनी प्रथमीच वीजचोरी केली असल्यास कायद्याने सदर गुन्हा कंपाऊंडींग करण्याची सोय आहे. वीजचोरीचे बील व कंपाऊंडींग रक्कम न भरलेल्या ग्राहकावर वीजकायदा २००३ कलम १३५ अंतर्गत गुन्हा दाखल करता येतो.

अन् ते चक्क पोलिसांनाच गेले बनावट खडे विकायला...

■मुंबई । दिगंबर जाधव,

किंमती खड्यांची विक्री करण्याच्या बहाण्याने नागरिकांची कोट्यवधींची फसवणूक करणाऱ्या टोळीला बेड्या ठोकल्या. त्यांच्याकडून बनावट खडेही जप्त करण्यात आले. पोलिसांनी ग्राहक बनून टोळीशी संपर्क साधून त्यांना जाळ्यात ओढले.

मागील काही दिवसांपासून किंमती खड़े विक्री करण्याच्या बहाण्याने फसवणुक करणारी एक टोळी मुंबईत सक्रीय असल्याची माहिती पोलीस उप आयुक्त प्रशांत कदम यांना मिळाली होती. ही टोळी २ तारखेला दादर रेल्वे स्टेशन परिसरातील स्वामी नारायण मंदिराजवळ वावरत असल्याचे समजताच माटुंगा पोलीस ठाण्याच्या पथकाने ग्राहक बनून टोळीला जाळ्यात ओढले. आरोपींनी पोलिसांच्या हाती किंमती खडे देत व्यवहार सुरू केला. पोलिसांनी सापळा रचून सहा जणांना अटक केली.

पालघरच्या संजुर हबीब खान (५८), जितेंद्रकुमार मिश्रीलाल ब्राम्हण (५०, राजस्थान), प्रकाश हरकिशनदास टेलर (४९, सुरत), मुंबईतील शैलेश सुभाष चव्हाण (४५), भालचंद्र पोपट तिलोर उर्फ दिपेश(४७) आणि मोहंमद इरफान अब्दुल कय्युम शेख (४३) याला अटक करण्यात आली आहे.

ड्रायव्हरची लायकी काढणाऱ्या कलेक्टरला 24 तासांत पदावरून हटवलं, मुख्यमंत्र्यांची अधिकाऱ्यांना नीट वागण्याची तंबी

■नवी दिल्ली। प्रगती शर्मा,

अनेकदा आपल्या हाती अधिकार आले तर तो अधिकारी वा राजकारणी व्यक्ती सर्वसामान्य लोकांना तुच्छ समजून त्याची लायकी काढतात, त्यांना सार्वजनिक ठिकाणी अपमानित करण्याची संधीही सोडत नाही. मध्य प्रदेशमधील अशाच एका कलेक्टरने एका ड्रायव्हरला त्याची लायकी विचारली आणि अपमानित केलं. पण हे कृत्य त्या कलेक्टरला चांगलंच महागात पडल्यांच दिसून आलं. शाजापूरचे कलेक्टर किशोर कन्याल यांना 24 तासांमध्ये पदावरून हटवण्यात आलं आहे. मध्य प्रदेशातील शाजापूरमध्ये ड्रायव्हरची लायकी विचारणाऱ्या कलेक्टर किशोर कन्याल यांच्यावर कारवाई करण्यात आली. या प्रकरणाची स्वतः मुख्यमंत्री डॉ.मोहन यादव यांनी दखल घेत त्यांना पदावरून हटवले. त्यांना पदावरून हटवण्यासोबतच मुख्यमंत्र्यांनी ते स्वतः गरिबांचे पुत्र असून हे सरकार गरिबांचे असल्याचे सांगितले. या सरकारमध्ये सर्वांचा सन्मान झाला पाहिजे. यासोबतच त्यांनी राज्यातील उर्वरित अधिकाऱ्यांनाही त्यांच्या भाषेवर नियंत्रण ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत.

आंदोलन करणाऱ्या ट्रक चालकाला खडसावलं

किशोर कन्याल यांना पदावरून हटवल्यानंतर मध्य प्रदेश सरकारने रिजू बाफना यांना शाजापूरचे जिल्हाधिकारी बनवले आहे. दोन दिवसांपासून सुरू असलेल्या ट्रक चालकांच्या संपादरम्यान जिल्हाधिकारी किशोर कन्याल यांनी शाजापूरमध्ये एका ट्रक चालकाला खडसावले होते. या घटनेचा एक व्हिडीओही सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये जिल्हाधिकारी किशोर कन्याल ड्रायव्हरशी गैरवर्तन करताना दिसत होते.

बनावट तूप बनवणाऱ्या कारखान्यावर कारवाई करणारा अधिकारी एसीबीच्या जाळ्यात

■ठाणे। विशाल पाटील,

कर आकारणीसाठी लाच स्वीकारणाऱ्या पालिकेच्या सहाय्यक आयुक्तासह तिघांना अटक करण्यात आली आहे. भिवंडी महानगरपालिकेच्या कर मूल्यांकन विभागाचे प्रभारी सहाय्यक आयुक्त सुदाम जाधव यांसह विभागातील कार्यालयीन अधिक्षिका सायरा बानो अन्सारी, प्रभारी लिपिक किशोर केणे या तिघांना दीड लाख रुपयांची लाच स्वीकारताना नवी मुंबईच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले आहे. या कारवाईने पालिका अधिकारी कर्मचारी यांच्यात खळबळ उडाली आहे. या कारवाईत आणखी काही जण अडकण्याची शक्यता वर्तविली जात आहे. विशेष म्हणजे सुदाम जाधव यांनी एक दिवसाआधीच बनावट तूप बनविण्याच्या कारखान्यावर कारवाई केली होती. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील नागाव येथील एका विकसित केलेल्या 13800 चौरस फूट क्षेत्रफळाचे मालमत्तेवर कर आकारणी करण्यासाठी तक्रारदाराने पालिका कर मूल्यांकन विभागात अर्ज दाखल केला होता.

संपादकीय
राकेश शंकर गोरे

..म्हणून अभिनंदन!

..सरकारी निर्णयांची घटनात्मकता तपासण्याचे अधिकार सर्वोच्च न्यायालयास असायलाच हवेत, असेच न्यायपालिकेचे मत पडले- अर्थात इस्त्रायलच्या. आणि ते त्यांनी नावानिशी नोंदवले.. सर्वप्रथम सर्वोच्च न्यायालयाचे त्रिवार अभिनंदन. हे सर्वोच्च न्यायालय इस्त्रायलचे. तेथे लोकशाही आहे. कोणत्याही लोकशाही व्यवस्थेत निवडून आलेल्या नेत्यांस दोन घटकांचा मोठा अडथळा वाटत असतो. एक म्हणजे प्रसार माध्यमे आणि दुसरी न्यायपालिका. त्या प्रमाणे इस्त्रायलचे विद्यमान पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनाही तसे वाटत असणार. पण त्यांचे दुर्दैव असे की ते स्वतःच्या देशातील माध्यमांच्या मुंडया पुरेशा ताकदीने आवळू शकले नाहीत. वास्तविक त्यांस इस्त्रायलच्या यहुदी धर्मप्रेमींचीही साथ आहे आणि त्यांच्या सरकारला कडव्या धर्मवाद्यांचा थेट पाठिंबा आहे. राजसत्तेची धर्मसत्तेशी इतकी बेमालूम हातमिळवणी झालेली असूनही त्या देशातील माध्यमे या दोघांस भीक घालण्यास तयार नाहीत. या माध्यमांविरोधात राष्ट्रद्रोह, देशविरोधी इत्यादी आरोप करून त्यांच्या मुसक्या आवळण्याची सोय नेतान्याहू यांस आहे किंवा काय, हे ठाऊक नाही. खरे तर पेगॅससारखे अद्भुत सॉफ्टवेअर हीदेखील इस्त्रायलची निर्मिती. त्या देशातील पत्रकार, चळवळे, सामाजिक कार्यकर्ते, न्यायाधीश इत्यादींच्या मोबाइल फोनमध्ये हे पेगॅसस घुसवून त्यांच्यावर गुप्तपणे हेरगिरी करण्याचा मार्ग नेतान्याहू यांनी चोखाळला किंवा काय हेही कळण्यास मार्ग नाही. माध्यमांस शांत करण्यात अपयशी ठरलेल्या या पंतप्रधानांनी अखेर न्यायपालिकेस गप्प बसविण्याचा पर्याय शोधला. त्यातूनच स्वतःच्या सरकारच्या बहुमताचा आधार घेत सरकारी निर्णयांचा फेरविचार करण्याचे न्यायपालिकेचे अधिकार काढून घेण्याचा घाट त्यांनी घातला. इस्त्रायलच्या सर्वोच्च न्यायालयाने लोकनियुक्त वगैरे पंतप्रधानांचा हा निर्णयच बेकायदा ठरवण्याची हिंमत दाखवली. म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे- अर्थातच त्या देशाच्या- मनःपूर्वक अभिनंदन. सक्षम लोकशाहीवर मनापासून प्रेम असलेल्यांस हा निर्णय खचितच कौतुकाचा वाटेल. सर्वोच्च न्यायालय वा अन्यही न्यायाधीशपिक्षा जनतेतून निवडून आलेले प्रतिनिधी अधिक महत्त्वाचे असे नेतान्याहू मानतात. त्याचमुळे जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींचे सभागृह सर्वोच्च न्यायालयास वरचढ असेल अशी घटनादुरुस्ती त्यांनी गतसाली आपल्या बहुमताच्या जोरावर मंजूर करवून घेतली. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचा कोणताही निर्णय बदलण्याचा अधिकार इस्त्रायली प्रतिनिधीगृहास - म्हणजे क्नेसेट ला - मिळाला. हे निर्णय बदलण्यासाठी १२० सदस्यांच्या क्नेसेटमधील फक्त ६१ प्रतिनिधींनी पंतप्रधानांसमोर मान तुकवली की झाले. साध्या बहुमताच्या जोरावरही सर्वोच्च न्यायालयाचा निकाल प्रतिनिधीगृह बदलू शकेल, असा अधिकार या निर्णयाद्वारे सरकारने स्वतःच्या हाती घेतला. इतकेच नव्हे. तर यापुढे सरकारने घेतलेल्या कोणत्याही निर्णयाचा फेरविचार करण्याच्या, तो निर्णय घटनेच्या तत्त्वाची पायमल्ली करीत असल्यास रद्दबातल करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकारांस नेतान्याहू यांनी यशस्वीपणे कात्री लावली. इस्त्रायलमध्ये न्यायाधीश नेमण्याची एक तटस्थ प्रक्रिया आहे. तीस अनुसरून स्वतंत्र यंत्रणेद्वारे न्यायाधीशांच्या नेमणुका केल्या जातात. नव्या निर्णयानुसार या यंत्रणेची गरज राहिली नाही. एखाद्या नोकरशहाप्रमाणे न्यायाधीश नेमणुकांचा अधिकारही प्रशासनाने स्वतःहाती घेतला. एका अर्थी न्यायपालिका पंतप्रधानांनी पूर्णपणे पंगू करून टाकली. आडमुठेशाही या संपादकीयातून (२६ जुलै २०२३) या निर्णयावर भाष्य केले होते आणि त्यात इस्त्रायलचा प्रवास लोकशाहीकडून हुकूमशाहीकडे सुरू असल्याची भीती व्यक्त केली होती. ती प्रत्यक्षात येण्याचा धोका सर्वोच्च न्यायालयाने- अर्थातच इस्त्रायलच्या- टाळला. म्हणून तेथील सर्वोच्च न्यायालयाचे अभिनंदन. या साऱ्यातील अत्यंत आश्वासक बाब म्हणजे बहुसंख्य यहुदी जनतेने पंतप्रधानांविरोधात कडकडीत निदर्शने केली. आपले सरकार एकाधिकारशाहीकडे निघालेले आहे, असेच अनेकांस वाटले आणि जुलैनंतर सुमारे तीन-चार महिने त्या देशात नेतान्याहूंविरोधात आंदोलने झाली. या घटनादुरुस्तीवर क्नेसेटमध्ये होणाऱ्या मतदानास विरोध करण्यासाठी संपूर्ण देशभरातून लाखो यहुदी स्त्री-पुरुष, युवा-वृद्ध नागरिक पायी तेल अविवकडे निघाले आणि नंतर त्यांनी आपल्या ह्यलोकशाही मंदिरा स घेराव घातला. सदनाबाहेर आणि देशभरातील आंदोलक आणि सुरक्षा यंत्रणा यांच्यात चकमकी झडल्या. याची दखल नेतान्याहू यांचे तारणहार अमेरिकेचे अध्यक्ष बायडेनबाबांसही घ्यावी लागली यावरून या आंदोलनाची तीव्रता ध्यानात येईल. नेतान्याहू यांनी सवयीप्रमाणे याकडे दुर्लक्ष केले आणि बहुमताच्या जोरावर सदर घटनादुरुस्ती क्नेसेटमध्ये रेटली. इस्त्रायली माध्यमांनीही आपल्या पंतप्रधानांवर जळजळीत टीका केलीच आणि आघाडीच्या प्रमुख वर्तमानपत्रांनी तर त्यावेळी आपल्या अंकांचे पहिले पृष्ठ ठार काळ्या रंगात कोरे छापले. अन्य कौतुकाचा मुद्दा म्हणजे इस्त्रायली लष्करानेही आपल्या पंतप्रधानांविरोधात खमकी भूमिका घेतली. विमानदळानेही सरकारी आदेशांचा भंग केला जाईल, असा इशारा दिला. इस्त्रायल म्हणजे आधी लष्कर आणि मग तो देश, हे वास्तव. त्यामुळे इस्त्रायली लष्कराच्या या भूमिकेने परिस्थिती इतकी स्फोटक झाली की आंदोलन हाताळण्यासाठी पंतप्रधान नेतान्याहू यांस राखीव दलास पाचारण करावे लागले. इस्त्रायल हा देश नवउद्यमींचीही गंगोत्री.

HEALTH AND SPORTS

VIRAT KOHLI JUMPS FOUR PLACES TO BE BACK IN TOP 10 IN LATEST ICC TEST RANKINGS

Dubai: Kohli had dropped out of the top 10 in 2022, but his 38 and 76 in the opening Test against South Africa last week brought him back into that bracket, according to ICC. Talismanic batter Virat Kohli jumped four places to ninth in the latest ICC Test Rankings after his decent show in the Centurion Test against South Africa. Kohli had dropped out of the top 10 in 2022, but his 38 and 76 in the opening Test against South Africa last week brought him back into that bracket, according to ICC. However, he is 103 rating points away from leader Kane Williamson, while Joe Root and Steve Smith took the second and third place respectively. India skipper Rohit Sharma dropped to 14th as he could only manage scores of five and zero in the Centurion. Besides Kohli and Rohit, KL Rahul moved up 11 slots to 51st after scoring 101 and four in the series opener. As for bowlers, Ravichandran Ashwin remained on the top spot in the ICC Test Rankings, despite managing one for 41 in Centurion, while Ravindra Jadeja and Jasprit Bumrah were at fourth and fifth places respectively. India sits at the top spot in the team ranking, on 118 points, ahead of Australia and England. The latest weekly update also considers performances in the second Test between Australia and Pakistan. Australia's Marnus Labuschagne has risen one spot to seventh after scoring a half-century in the first innings, while Alex Carey (up four places to 41st) and Mitchel Marsh (up 16 places to 52nd) have also risen. Pakistan hitters Saud Shakeel (up one spot to 13th), Abdullah Shafique (up three spots to 21st), and Mohammed Rizwan (up four spots to 27th) advanced following the Melbourne Test, which Australia won by 79 runs to take a 2-0 lead in the three-Test series.

INDIA PACER'S ELECTRIC 6-WICKET HAUL SLICES THROUGH SOUTH AFRICA AS HOSTS SLUMP TO 96-YEAR-LOW

NEW DELHI : There were a couple aimed at Dean Elgar's rib cage. The South Africa stand-in skipper, in his last Test, somehow managed to survive even though one lobbed in the air and landed agonisingly close to the short leg and short mid on fielders. India were out there with a clear plan in the second Test at Newlands in Cape Town. Or were they? After Mohammed Siraj peppered Elgar's weak point - he has been out caught down the leg four times in his last three Test - Jasprit Bumrah dished out a toe-crushing yorker that nearly swept the left-hander's off his feat. The wry smile on his face was perhaps the biggest indicator that the Indian pacers were back. And that there was no pattern to their destruction. Both edges were being challenged. It was going to be head-to-toe stuff. This was the pace attack that tormented batters around the world for the last five years. They had merely taken a breather in Centurion. While all this was happening at Elgar's end, Siraj was working his way through Aiden Markram, the other South African opener. He started off with a few deliveries pitched on good length. The noticeable factor was the bounce. It made it impossible for Markram to get on top of it and drive it through the covers - his go-to shot in any format. Siraj understood this. After softening him up, he pitched one lightly fuller but with the same shape towards the slips. Markram, wary of the bounce, did not get a big stride in and offered a push with hard hands. The ball swung and got the outside edge.

ENGLAND LEGEND LANDS DOUBLE-EDGED SWORD ON SKY

NEW DELHI : Suryakumar Yadav remains an enigma in international cricket. While his T20I numbers continue to peak, his ODI returns are plummeting. Suryakumar, who finally seemed to be decoding the 50-overs format with consecutive half-centuries against Australia prior to the World Cup, crashed and burned when it was time for the real test. His painstaking innings of 18 off 28 balls when India needed him to fire the most in the World Cup final led to a sea of criticism and by all means, has shut the doors in his ODI career for now. However, during the T20Is against Australia right after the World Cup, Surya was back at his dazzling best, scoring 80 in Vizag and following it with a 56 and a breathtaking century against South Africa in Johannesburg. Surya, who became the No. 1 ranked T20I batter in T20Is back in October 2022 has held on to the position ever since, purely because of the red-hot form he has exuded in his comfort zone of T20 cricket. Given how he finished the previous year, former England captain Nasser Hussain has singled out SKY as the player to watch out for at the T20 World Cup. Drawing a huge contrast between his form in the two formats, Hussain, while marveling at SKY's T20I numbers, expressed surprise at his ODI returns. "The person for the world to watch out for at the moment in T20 is Suryakumar Yadav," Hussain told ICC. "I mean, the bloke is a freak. The cliche of Mr. 360, but some of the shots he plays... and he is a bit of a freak because in fifty-overs cricket, he doesn't quite know when to go, when not to go, what to do. But in T20 cricket, he absolutely knows what to do almost every single time, and it's a fun game, T20 cricket and watching SKY, that is absolutely fun."

SUPERFOOD HONEY : KNOW THESE 5 BENEFITS OF SHAHAD

Honey has been a staple in many households for centuries, not only as a natural sweetener but also for its numerous health benefits. But did you know that there is a specific type of honey that takes these benefits to the next level? Known as 'shahad' in Hindi, superfood honey is created by bees that feed on the nectar of specific flowering plants with medicinal properties. Here are five benefits of honey that you need to know:

Boosts Immunity

One of the key benefits of honey is its ability to boost the immune system. This superfood honey contains a high concentration of antioxidants, enzymes, and vitamins that help in fighting off bacteria and viruses. It also has anti-inflammatory properties that reduce inflammation in the body, making it an excellent natural remedy for common colds, coughs, and allergies.

Aids Digestion

Honey is not only good for boosting immunity but also for aiding digestion. It contains enzymes that help break down food and improve digestion. These enzymes also help in promoting the growth of good bacteria in the gut, which is essential for a healthy digestive system.

Rich in Nutrients

Honey is a superfood packed with essential nutrients such as amino acids, minerals, and vitamins. This makes it a great addition to your diet, especially if you are looking to boost your overall health and well-being.

Improves Skin Health

You may have heard of using honey in face masks and other beauty products. Shahad is no exception; it is known for its benefits in improving skin health. This superfood honey has antibacterial and anti-inflammatory properties that can help in reducing acne, blemishes, and other skin issues.

Supports Weight Management

Contrary to popular belief, shahad can help with weight management when consumed in moderation as part of a healthy diet. This superfood honey contains natural sugars that are easily digestible and provide an instant burst of energy without causing a spike in blood sugar levels. However, it is essential to keep in mind that not all honey is created equal. To reap the maximum benefits of shahad, make sure to look for raw and unprocessed honey from a trusted source. Also, avoid heating shahad as it can reduce its nutritional value.

WHY DOES IMPROVING BODY IMAGE TOP NEW YEAR RESOLUTIONS LIST?

Increasingly visual and digital culture has led us to believe that how we look is intrinsic to our self-worth, said researchers as improving body image again tops new year resolution list. A YouGov Poll revealed that for the last four years in a row, the top three New Year's resolutions people intended to make were about getting a better body, namely doing more exercise, losing weight and improving diet. Researchers from the University of Warwick warned about lookism and the toxic resolutions in a social media-fueled body-critical era. "Doing more exercising, losing weight and dieting are common New Year's resolutions which might be undertaken under the guise of improving one's health, but it is often for beauty," said Professor Heather Widdows, a leading beauty philosopher at the varsity. "We used to think we had to change what's on the inside to be better, we now increasingly judge ourselves and others on looks or how we present ourselves to the world. What we value and what matters to people has dramatically shifted in recent years with the advent of social media. "Looks matter to us-this shift is radically changing our identity and our sense of self-worth, and we are barely recognising it," Widdows said.

Many benefits of Kodo Millet

HOW TO EAT KODO MILLETS FOR WEIGHT LOSS, LOWERING CHOLESTEROL; KNOW ALL

Ancient Wisdom is a series of guides that shines a light on age-old wisdom that has helped people for generations with time-honoured wellness solutions to everyday fitness problems, persistent health issues and stress management, among others. Through this series, we try to provide contemporary solutions to your health worries with traditional insights.

With millets in spotlight across the world, their different varieties, nutritional benefits and ways to consume them have gained popular interest. Kodo millet, an ancient grain, has been making its way to the contemporary kitchen in the form of soups, flatbreads, porridge, cookies, salads and other snacks. Originated in tropical Africa, Kodo millet also known as cow grass, rice grass, ditch millet, and Native Paspalum has been in use in India for 3,000 years. Millet consumption in the country dates back to thousands of years. No wonder the grains find mention in various ancient texts such as Yajurveda and other scriptures. As the nutritional benefits of millets are recognised world-over, the trend of its increased consumption is seen in India and beyond. A drought-resistant and environment-friendly grain, Kodo millet is a nutritional powerfulhouse with high amounts of fibre, good quality protein and a variety of vitamins and minerals. A low-glycaemic food and antioxidant rich, Kodo is recommended for people with diabetes. As per nutritionvalue.org, Kodo millets with its low-fat content is an ideal weight loss food. A good source of dietary fibre, Kodo helps you feel full for longer and promotes digestive health. Besides, they also are a good source of B vitamins such as niacin, thiamine, and riboflavin. Kodo is also suitable for people who are gluten-intolerant or have celiac disease. Whether you are aiming to lose weight, manage diabetes, or looking for a gluten-friendly option, Kodo is your go-to grain. It is also a vrat-friendly grain and can be eaten during Navratri, Ekadashi and similar fasts. "In the realm of nutrition, Kodo millets stand out as a powerhouse of benefits. From their ancient roots to contemporary kitchens, these grains offer a wealth of advantages. Exploring their historical consumption, diverse culinary uses, and considerations for specific individuals unveils the true essence of Kodo millets in fostering a healthier lifestyle," says Dietician, Vidhi Chawla, founder of Fisico Diet and Aesthetic Clinic. Chawla also share benefits, how people consumed these grains in ancient times and who should skip the millet.

Benefits of Kodo millets

1. Nutrient-rich goodness: Packed with essential nutrients like fibre, vitamins, and minerals, Kodo millets also boost digestion, enhance immunity, and support overall well-being.
2. Gluten-free marvel: Kodo millets are ideal for those with gluten sensitivities or celiac disease and offer a safe and diverse grain option.
3. Weight management ally: Kodo millets support weight loss due to its high fibre content, promoting a feeling of fullness. They aid in maintaining a healthy and balanced diet.
4. Heart-healthy option: Kodo millets contribute to heart health by helping control cholesterol levels. They contain antioxidants that are beneficial for cardiovascular well-being.
5. Versatile and adaptable: Kodo millets fit into various culinary styles, enhancing the nutritional profile of diverse dishes. They add a nutty flavour to meals, making them not only healthy but also delicious.

How Kodo millets were consumed in ancient times

In ancient civilizations, Kodo millets were a dietary staple. Communities across diverse regions recognised their adaptability and resilience in various climates. Chawla explains how these grains found their way into ancient kitchens: Versatile culinary use: Ancient cultures embraced Kodo millets for their versatility. These grains were transformed into nourishing porridges, hearty stews, and wholesome flatbreads. The adaptability of Kodo millets made them an indispensable part of daily meals. Reliable food source: Kodo millets were revered for their ability to thrive in different environmental conditions. This reliability made them a consistent and accessible food source for communities, ensuring sustenance even in challenging times.

Ways to eat Kodo millets

1. Nutty porridge: Begin your day with a nutritious millet porridge using milk or water. Add fruits and nuts for a delightful and healthy breakfast.
2. Flavourful pilafs: Substitute rice with Kodo millets in your favourite pilaf recipe. Enjoy the enhanced nutty taste and nutritional benefits.
3. Millet salad: Create a refreshing salad by mixing cooked Kodo millets with colourful vegetables and herbs. Drizzle with a zesty dressing for a quick and light lunch option.

Who shouldn't have Kodo millet

1. Potassium sensitivity: It is important for individuals with kidney issues or potassium sensitivity to exercise caution. Kodo millets contain potassium, and excess intake may not be advisable.
2. Consultation advised: Before incorporating Kodo millets into the diet, especially for those with health concerns, seeking advice from a healthcare professional is wise. Individual health needs should be considered for a tailored approach

रितेश देशमुखचं 'बिग बॉस १७' मधील अभिषेक कुमारला समर्थन, पोस्ट करत म्हणाला...

मनोरंजन जगतातील सर्वात वादग्रस्त शो म्हणजे 'बिग बॉस 17'. आता बिग बॉसच्या 17 वा सिझन फायनलकडे वळत आहेत. त्यामुळे जसजसा फिनाले जवळ येत आहे, तसतशी प्रेक्षकांची उत्सुकता आणि घरात वेगवेगळे ट्विस्ट होत आहेत. नुकतेच बिग बॉसच्या घरात अभिषेक आणि ईशा-समर्थ यांच्यात यांच्यात वाद झाला. यावर अनेकांनी अभिषेकला पाठिंबा दिला आहे. केवळ चाहतेच नाही तर अनेक सेलेब्सही अभिषेकचे कौतुक करत त्याला पाठिंबा देत आहेत. बॉलिवूड अभिनेता रितेश देशमुखनेदेखील अभिषेक कुमारला समर्थन दिलं आहे. रितेश देशमुखने अभिषेक कुमारसाठी ७वर ट्विट केले. त्याने हे ट्विट बिग बॉसलाही टॅग केले आहे. 'अभिषेक कुमारची अवस्था पाहून खरोखरच खूप वाईट वाटतं आहे', अशी पोस्ट रितेशने केली आहे. तसेच अंकित गुप्ता, राजीव अडातिया आणि ऐश्वर्या शर्मा यांनी अभिषेकला पाठिंबा दिला आणि ईशा-समर्थ यांच्यावर कारवाई करण्याचे आवाहन बिग बॉसला केले. 'बिग बॉस 17' च्या एपिसोडमध्ये नॉमिनेशन टास्क दरम्यान समर्थ आणि ईशा जाणीवपूर्वक अभिषेकला चिडवताना दिसले. ईशा मालवीय आणि समर्थ जुरेल अभिषेकला खूप त्रास असल्याने अभिषेक कुमारच्या चाहत्यांसाठी बिग बॉस पाहणे खरोखर कठीण झालं आहे. ईशा आणि समर्थ अभिषेकशी छोट्या छोट्या गोष्टीवरून भांडण करत आहेत. त्यामुळे आता बिग बॉस आणि सलमान खान या घटनेनंतर काय शिक्षा करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सध्या घरात अंकिता लोखंडे, विकी जैन, मुनव्वर फारुकी, आयशा खान, ओरी, ईशा मालवीय, अभिषेक कुमार, समर्थ जुरेल, मन्नारा चोप्रा, अरुण महाशेट्टी, समर्थ जुरेल हे स्पर्धक आहेत. आता बिग बॉसच्या घरातून कोण बाहेर पडणार आणि बिग बॉसची ट्रॉफी कोण उंचावणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

'५ वर्षे हा मुलगा रुईयामध्ये माझ्या...', क्रांती रेडकरने शेअर केला नवऱ्यासोबतचा गोड व्हिडीओ

क्रांती रेडकर ही मराठी कलाविश्वातील लोकप्रिय अभिनेत्री म्हणून ओळखली जाते. अभिनेत्री प्रत्येकवेळी आपल्या नवऱ्याला खंबीरपणे साथ देताना दिसते. दोघेही वैयक्तिक आयुष्यामुळे कायम चर्चेत असतात. क्रांती सोशल मीडियावर प्रचंड सक्रिय असते. विविध पोस्टद्वारे ती चाहत्यांच्या संपर्कात असते. क्रांतीने नुकत्याच शेअर केलेल्या एका व्हिडीओने सध्या सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. क्रांतीनं नवऱ्याबरोबरच रोमँटिक व्हिडिओ शेअर केला आहे. व्हिडीओमध्ये हे जोडपं आईसक्रिम खाताना दिसत आहे. क्रांतीनं व्हिडीओला दिलेल्या कॅप्शनमध्ये लिहलं, '५ वर्षे हा मुलगा रुईयामध्ये माज्या वर्गात होता आणि मला तरी माहित होते का एक दिवस तोच माझ अख्ख जग बनेल'. त्यांच्या गोड व्हिडीओवर खूप कमेंट्स व लाइक्स येत आहेत.

'४ वर्ष, १२०० एपिसोड आणि...', 'आई कुठे काय करते' मधील अरुंधतीची भावुक पोस्ट

'आई कुठे काय करते' ही छोट्या पडद्यावरील लोकप्रिय मालिकांपैकी एक आहे. अल्पावधीतच या मालिकेने प्रेक्षकांच्या मनात घर केलं. या मालिकेतील देशमुख कुटुंब प्रेक्षकांना आपलंसं वाटतं. 'आई कुठे काय करते'मध्ये अरुंधतीची भूमिका साकारून अभिनेत्री मधुराणी प्रभुलकर घराघरात पोहोचली. या मालिकेने तिला खऱ्या अर्थाने लोकप्रियता मिळवून दिली. मधुराणीचा चाहता वर्गही प्रचंड मोठा आहे. ती सोशल मीडियावरही प्रचंड सक्रिय असल्याचं पाहायला मिळतं. नुकतंच 'आई कुठे काय करते' मालिकेने १२०० भागांचा टप्पा पूर्ण केला आहे. या निमित्ताने मधुराणीने एक खास व्हिडिओ शेअर केला आहे. आई कुठे काय करतेला ४ वर्ष पूर्ण झाली. आज आम्ही १२०० वा एपिसोड पूर्ण केला. किती छान प्रवास होता!!!

'हास्यजत्रेमुळे अनेक सिनेमे हातातून गेले', प्राजक्ताचं स्पष्ट वक्तव्य

प्राजक्ता माळी ही मराठी कलाविश्वातील लोकप्रिय अभिनेत्री आहे. आजवर अनेक मालिका आणि चित्रपटांत तिने काम केलं आहे. पण, तिचा एकही चित्रपट सुपरहिट ठरला नाही. प्राजक्ताने राजश्री मराठीला दिलेल्या मुलाखतीत याबाबत खंत व्यक्त केली. ती म्हणाली, मला पहिला चित्रपट पटकन मिळाला. त्यानंतर केदार शिंदेंची खो खो केला. पण, सई ताम्हणकर, सोनाली, हृता यांच्या नावावर टायटल गेल्या असलेले चित्रपट आहेत. पण, माज्यावर नावावर असा चित्रपट नाही.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore.
• Office contact no. 022-26515151, Mob.9892386748 / 9809386748, Website: www.lokrakshanay.com, Email: daniklokrakshanay@gmail.com, Legal Advisor: D. K. Pandey B.A.L.L.B.(High Court Mumbai), (ठाणे न्याय कक्षेत)

पंतप्रधानांच्या हस्ते विविध प्रकल्पांच्या भव्य उद्घाटनासाठी नवी मुंबई विमानतळावर सिडको मैदान बनविणार

■पनवेल । प्रतिनिधी,

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राज्य सरकारचा महत्वकांक्षी प्रकल्प शिवडी-न्हावा शेवा सागरीसेतू महामार्ग (अटलसेतू) तसेच उरण खारकोपर रेल्वे मार्ग अशा विविध प्रकल्पांचा भव्य उदघाटनासाठी नवी मुंबईत येत आहेत. हा उदघाटन सोहळ्या भव्य होण्यासाठी प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाचे ठिकाण निवडण्यात आले आहे. या दोन्ही प्रकल्पांमुळे नवी मुंबईच्या दळणवळणाला मोठी चालना मिळणार आहे. तसेच येथील जमिनीचे भाव गगणाला भिडतील.

नवी मुंबईतून २० मिनिटांत थेट मुंबई येथील शिवडी येथे वाहनांना जाता येणार असल्याने हा अटलसेतू मुंबई व नवी मुंबईकरांना अतिशय लाभदायी ठरणार आहे. त्यामुळे नवी मुंबईत होणाऱ्या पंतप्रधान मोदींच्या हस्ते भव्य उदघाटन सोहळ्यासाठी सिडको महामंडळाने सूमारे ७ कोटी ८८ लाख रुपयांची कामे हाती घेतली आहेत. याबाबतची बोलीपद्धतीची निविदा बुधवारी विविध वर्तमानपत्रातून जाहीर करण्यात आल्या आहेत. उदघाटन सोहळा होत असलेल्या विमानतळ प्रकल्पातील जागेवर प्रवेशव्दार आणि बाहेर जाण्याचा मार्ग तसेच अंतर्गत रस्ते बनविण्यासाठी २ कोटी ६५ लाख रुपये आणि मैदान तयार करणे, मंडप बांधणे, वाहनतळाची सोय करण्यासाठी ५ कोटी २३ लाख रुपयांची कामे सिडको कंत्राटदारांच्या मार्फत करणार आहे. यासाठीची बोली पद्धतीने निविदा सिडको मंडळाने ठेकेदारांकडून ४ जानेवारीपर्यंत मागविल्या आहेत.

अद्याप पंतप्रधान मोदी नेमके येणार कधी याची वेळ आणि दिवस निश्चित झालेला नाही. यापूर्वी सुद्धा सिडको मंडळाने नवी मुंबई मेट्रो प्रकल्पाच्या उदघाटनासाठी विमानतळावर मंडप व मैदान बांधण्यासाठी निविदा प्रक्रीया राबविली होती.

लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी राज्य सरकारला विविध प्रकल्पांचे उदघाटन सोहळे आटपून घ्यायचे आहेत. यापूर्वी नवी मुंबई मेट्रोचे उदघाटन पंतप्रधानांच्या हस्ते होणार होते. परंतू पंतप्रधानांची वेळ मिळत नसल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रवाशांचा विचार करुन कोणत्याही सोहळ्याशिवाय सर्वसामान्यांसाठी बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीदिनी नवी मुंबई मेट्रोची सेवा सुरु केली होती.

शिळफाटा पुन्हा चर्चेत, बेशिस्त वाहन चालकांमुळे होत आहे वाहतूक कोंडी

■ कल्याण। प्रतिनिधी,

शिळफाटा रस्त्यावर अनेक ठिकाणी ठेकेदाराने रस्ता दुभाजकाची पक्की बांधणी केलेली नाही. या मोकळ्या जागेतून अनेक वाहन चालक वाहने घुसवित असल्याने शिळफाटा रस्त्यावर अलीकडे नियमित कोंडी होत आहे. काही ठिकाणी सरकते दुभाजक उभे करण्यात आले आहेत. वाहन चालक ते बाजुला करून आवश्यक त्या ठिकाणी वाहने नेत आहेत. शिळफाटा रस्त्यावरील या बेशिस्त प्रकारामुळे अनेक महिन्यांपासून कोंडीमुक्त असलेला शिळफाटा रस्ता आता पुन्हा कोंडीच्या विळख्यात अडकू लागला आहे. शिळफाटा रस्त्यावरील रस्ता मोकळ्या दुभाजकांमध्ये आठवड्यातून दोन ते तीन वेळा मोटार, ट्रक अडकतो. काही वेळ या रस्त्यावर कोंडी होते, असे स्थानिक रहिवासी सांगतात. शिळफाटा रस्त्यावरील गावांमधून मुख्य रस्त्यावर येणाऱ्या ४२ छेद रस्त्यापैकी ३५ हून अधिक छेद रस्ते वाहतूक विभागाने राज्य रस्ते विकास महामंडळाच्या सूचनेप्रमाणे बंद केले आहेत. या बंद पोहच रस्त्यामुळे गावातून येणाऱ्या किंवा गावात जाणाऱ्या वाहन चालकांना वळण घेऊन इच्छित स्थळी जावे लागते. हा वेळसा टाळण्यासाठी अनेक वाहन चालक, प्रवासी शिळफाटा रस्त्यावरील दुभाजकामधील मधल्या मोकळ्या रस्त्याने वाहन आडवे टाकून दुसऱ्या मार्गिकेतून इच्छित स्थळी जातात. दुसऱ्या मार्गिकेत जाताना काही ठिकाणी रस्ता दुभाजकांमध्ये दीड फुटाचा खोल खड्डा आहे. या खड्ड्यात चाक अडकले की तात्काळ वाहन बाहेर येत नाही. ते बाहेर काढेपर्यंत या मार्गिकेतून सर्व वाहने खोळंबून राहतात, असे प्रत्यक्षदर्शी काटईचे ग्रामस्थ नरेश पाटील यांनी सांगितले.

शिळफाटा रस्त्यावरील ढाबे, पेट्रोलपंप चालक यांच्या सोयीसाठी रस्ता दुभाजक अनेक ठिकाणी मोकळे तर काही ठिकाणी बंद केले आहेत.

एनएमएमटीची पनवेल-वांद्रे एसी बस बंद; ८ वर्षांवरील जुन्या वाहनांना मुंबईत प्रवेश नसल्याचे परिणाम

■मुंबई । प्रतिनिधी,

गेल्या वर्षभरात म्हणजेच २०२३ या वर्षात एनएमएमटीच्या ताफ्यात एकही नवीन बस आलेली नाही. त्यामुळे अनेक प्रवासीमार्गांवर चालवण्यासाठी बसगाडी उपलब्ध नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. परिणामी, एनएमएमटीच्या वतीने पनवेल ते वांद्रे या मार्गावर चालवली जाणारी वातानुकूलित बससेवा १ जानेवारीपासून बंद करण्यात आली आहे. आठ वर्षांवरील जुन्या वाहनांना मुंबईत प्रवेश नसल्याने या मार्गावरील वातानुकूलित बससेवा बंद झाली आहे. पयार्यी सुविधा म्हणून या मार्गावर परिवहनने साध्या बसगाड्या सुरू केल्या आहेत. मात्र या साध्या बसना प्रवाशांचा हवा तसा प्रतिसाद मिळत नसल्याचे समोर आले आहे. एनएमएमटीच्या वतीने नवी मुंबई महापालिका हद्दीसह हद्दीबाहेरही प्रवासी वाहतूकसेवा पुरवली जाते. यात ठाणे, कल्याण, डोंबिवली, पनवेल, उरण, खोपोलीसह मुंबईसारख्या शहरांचा समावेश आहे. नवी मुंबई ते वांद्रे, बोरिवली, मंत्रालय या महत्त्वाच्या मार्गांवर वातानुकूलित बससेवा चालवली जाते. त्यानुसार, गेल्या १५ वर्षांपासून एनएमएमटीकडून पनवेल-वांद्रे बससेवा दिली जात आहे. १०५ क्रमांकाचा हा मार्ग आहे. सुरुवातीला डिझेल वातानुकूलित, मग साधी, त्यानंतर इलेक्ट्रिक आणि सध्या डिझेल वातानुकूलित बसगाड्या या मार्गावर चालवल्या जातात. दिवसभरासाठी या मार्गावर सहा बसगाड्या चालवल्या जातात. त्यांच्या दिवसाला २४ फेऱ्या होत असतात. मुंबईमध्ये सध्या आठ वर्षांवरील जुन्या बसगाड्या चालवण्यावर बंदी आहे. त्यामुळे त्यापेक्षा जुन्या बसगाड्या मुंबईतील मार्गांवर चालवता येत नाहीत. एनएमएमटीच्या वतीने, सध्या या मार्गावर चालवल्या जाणाऱ्या, डिझेलवरील वातानुकूलित बस या आठ वर्षे जुन्या झाल्या आहेत. त्यामुळे या बसगाड्या परिवहनला मुंबईत पाठवता येत नाहीत. यासाठी आठ वर्षांपेक्षा कमी जुन्या बसगाड्यांची गरज परिवहनला आहे. मात्र परिवहनकडे अशा बसगाड्याच नसल्याने प्रशासनाला या मार्गावर नाईलाजाने साध्या बस चालवाव्या लागत आहेत. सन २०२३मध्ये परिवहन विभागाच्या ताफ्यात एकही नवीन बस दाखल झालेली नाही.

मालवाहतूकीच्या संपाचा फटका, मटार महागला

■पनवेल। प्रतिनिधी,

मालवाहतूकीच्या संपाचा सर्वाधिक फटका गुजरातहून पनवेलच्या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये विक्रीस येणाऱ्या वटाणा शेंगा म्हणजे मटार या भाजीला बसला. इतर पालेभाज्यांची आवक मंगळवारपेक्षा बुधवारी पहाटे मोठ्या प्रमाणात झाली असली तरी मटार घाऊक व्यापाऱ्यांनीच चढ्या दराने खरेदी केल्याने याची आवक अतिशय कमी झाल्याचे बुधवारी पहाटे पनवेलच्या कृषी उत्पन्न बाजारात पाहायला मिळाले. बुधवारी घाऊक बाजारात १२० रुपयांनी किरकोळ व्यापाऱ्यांनी मटार खरेदी केला. त्यामुळे किरकोळ व्यापारी ते थेट गृहिणी आणि हॉटेल चालकांपर्यंत १४० रुपये प्रति किलोग्रॅमने विक्री होण्याची चिन्हे होती. मंगळवारी याच मटारची विक्री ६० रुपये प्रती किलोग्रॅमने घाऊक बाजारात झाली होती. दुप्पटीची दरवाढ झाल्याने सर्वसामान्य गृहिणींना संपानंतर काही दिवस तरी चढ्या दराची मटारची शेंग स्वस्त होण्याची प्रतिक्षा करावी लागणार आहे. पनवेलच्या बाजारामध्ये माल वाहतूक संपामुळे मंगळवारी ३३ वाहने भरुन भाजीपाला व कांदेबटाट्याची आवक झाली. मात्र संप माघारीची बातमी मंगळवारी रात्री समजताच पनवेलच्या कृषी उत्पन्न बाजारात ४१ वाहनांमधून भाजीपाला व कांदाबटाट्याची आवक झाली. बुधवारी संप माघारीचे वृत्त अनेक किरकोळ भाजीविक्रेते व्यापा-यांना माहित नसल्याने मोठ्या प्रमाणात बाजारात भाजी खरेदीसाठी गर्दी दिसत होती.

कल्याणमध्ये कॉंक्रीट रस्त्याची तोडफोड करून नवीन रस्त्याची बांधणी; म्हसकर रुग्णालय ते परळीकर रस्त्यावरील कोंडीने प्रवासी हैराण

■ कल्याण । प्रतिनिधी,

कल्याण पश्चिमेतील मुरबाड रस्त्याला समांतर परळीकर वखार ते डॉ. म्हस्कर रुग्णालय दरम्यानचा आठ वषार्पूर्वी बांधलेला सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता तोडून पुन्हा नव्याने पालिकेने रस्ता बांधण्यास सुरूवात केल्याने या भागातील रहिवाशांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. अगोदरच दजेर्दार रस्ता बांधला असता तर ही वेळ पालिकेवर आली असती का, असे प्रश्न या भागातील नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत. परळीकर वखार ते डॉ. म्हसकर रूग्णालय दरम्यानचा सुमारे ५० ते ६० मीटरचा रस्ता आठ वषार्पूर्वी पालिकेने ठेकेदाराकडून कॉंक्रीटचा बांधून घेतला होता. हे काम ठेकेदाराने अतिशय निकृष्ट दजार्चे केल्याने आणि पालिकेने या रस्त्यावर योग्य देखरेख न ठेवल्याने या कॉंक्रिटच्या दणकट रस्त्याला भेगा पडल्या. कॉंक्रीटचे रस्त्याचे तुकडे वाहनांच्या वर्दळीत निघू लागले. या रस्त्यासाठी पालिकेने लाखो रूपयांचा खर्च करून तो पाण्यात घालविला, अशी टीका त्यावेळी नागरिकांकडून केली जात होता.

मध्य रेल्वेवर आजचा दिवस ठरला अपघाताचा, गेल्या २४ तासांत ४ प्रवाशांचा अपघातात मृत्यू

■डोंबिवली । प्रतिनिधी,

डोंबिवली रेल्वे पोलीस स्टेशनच्या हद्दीत आज बुधवारचा दिवस घातपाताचा दिवस ठरला आहे. गेल्या २४ तासांत घडलेल्या वेगवेगळ्या अपघातात चौघांचा दुदैर्वी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. यामध्ये दोन महिला आणि दोन पुरुषांचा समावेश आहे. डोंबिवली रेल्वे पोलीस स्टेशनच्या हद्दीत अपघात सत्र सुरुच असल्याचे समोर आले आहे. गेल्या २४ तासांत वेगवेगळ्या अपघातात ४ जणांचा मृत्यू झाला आहे. यातील अपघातातील एका मृतदेहाची ओळख पटली आहे. तर तिघांच्या वारसांचा शोध सुरू आहे, अशी माहिती डोंबिवली रेल्वे पोलिसांनी दिली आहे. यामधील दोघांचा मृत्यू दरवाजात उभे असताना बाजूच्या खांबांचा फटका लागून किंवा लोकलमधील गदीर्मुळे झाला असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.. पहिल्या घटनेत ठाकुर्ली ते कल्याणदरम्यान रात्री सव्वा बाराच्या सुमारास एका 50 वर्षीय महिलेचा अज्ञात रेल्वे गाडीची धक्का लागल्याने मृत्यू झाला आहे. तर आज सकाळी सव्वा आठ वाजण्याच्या सुमारास ठाकुर्ली ते डोंबिवलीदरम्यान मार्गावर जलद लोकलमधून पडल्याने एका 45 वर्षीय महिलेने जीव गमावला. तिसऱ्या घटनेत सकाळी 8.40 वाजण्याच्या सुमारास अज्ञात गाडीतून पडून सुशील या पन्नास वर्षीय व्यक्तीला जीव गमवावा लागला. तर सुमारे 42 वर्षाच्या व्यक्तीला कोपर ते डोंबिवलीदरम्यान अज्ञात रेल्वे गाडीने धडक दिल्याने त्याचा जागीच मृत्यू झाल्याची नोंद रेल्वे पोलिसांनी केली आहे.

कल्याण-डोंबिवलीतील पोलीस ठाण्यांमध्ये या आणि स्वतःच तक्रार नोंदवा

■ कल्याण। प्रतिनिधी,

कल्याण-डोंबिवलीत आठ पोलीस ठाण्यांमध्ये नागरिक तक्रार नोंदविण्यास आले तर त्यांना यापुढे पोलिसांची सल्ला मसलत न करता थेट स्वयं तक्रार मंचाच्या (सेल्फ हेल्प डेस्क) माध्यमातून तक्रार नोंदविण्याची सुविधा ठाणे पोलीस आयुक्तालयाने उपलब्ध करून दिली आहे. ठाणे पोलीस आयुक्तालय परिसरातील कल्याण मधील हा पथदर्शी प्रकल्प यशस्वी झाला तर तो संपूर्ण ठाण पोलीस आयुक्तालय परिसरातील पोलीस ठाण्यांमध्ये राबविला जाईल, अशी माहिती ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी मंगळवारी येथे दिली. पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी ठाणे पोलीस आयुक्त पदाचा पदभार घेतल्यानंतर आयुक्तालय क्षेत्रात नवनवीन नागरी हिताचे उपक्रम पोलीस ठाण्याच्या माध्यमातून राबविण्यास सुरूवात केली आहे. नागरिकांना पोलीस ठाण्यात आल्यानंतर पोलिसाची मदत न घेता स्वताहून तक्रार दाखल करण्याची मुभा असली पाहिजे. पोलीस ठाण्यात आलेला तक्रारदार पोलिसांनी तक्रार दाखल करून घेतली नाही म्हणून परत जाता कामा नये, या उद्देशातून आयुक्त डुंबरे यांच्या संकल्पनेतून स्वयं तक्रार मंचची संकल्पना पुढे आली आहे.

तलासरी, डहाणू तालुक्यात पुन्हा भूकंपाचा धक्का



■कासा। प्रतिनिधी,

पालघर मधील तलासरी व डहाणू तालुका पुन्हा एकदा भूकंपाने हादरला आहे. आज दुपारी १:४७ मिनिटांच्या सुमारास ३.४ रिष्टर स्केलचा भूकंपाचा धक्का बसला. भूकंपामुळे नागरिकांमध्ये पुन्हा भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पालघर मधील डहाणू आणि तलासरी तालुक्यात २०१८ पासून भूकंपाचे धक्के बसण्याचे प्रकार सुरू आहेत. या वर्षी जानेवारीच्या पहिल्या आठवड्यामध्ये भूकंपाचे हादरे जाणवत आहेत. अचानक पुन्हा सुरू झालेल्या भूकंपाच्या हादऱ्यांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये पुन्हा भीती पसरली आहे. भूकंपामुळे आपत्कालीन परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्यामुळे प्रशासनाकडून भूकंप प्रवण क्षेत्रात पुन्हा जनजागृती करून सुरक्षा साधनांचे वाटप करण्याची मागणी करण्यात येत आहे.

महावितरणच्या कर्मचाऱ्याला मारहाण केल्याप्रकरणी आरोपींवर गुन्हा दाखल

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

■पनवेल । प्रतिनिधी,

वीज महावितरण कंपनीच्या पनवेल विभागातील नावडे शाखा कार्यालयातील वरीष्ठ तंत्रज्ञ कर्मचाऱ्याला मारहणी प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सरकारी कामात अडथळा आणि मारहाण असे विविध गुन्हे पाटील पिता-पुत्रांवर दाखल केले आहेत. महावितरण कंपनीचे वरिष्ठ तंत्रज्ञ संदेश खुटले व त्यांचे सहकारी जितेंद्र पाटील हे ३० डिसेंबरला नेहमी प्रमाणे थकबाकीची वसुलीसाठी वावंजे गाव येथे गेले होते. वीज ग्राहक दत्तात्रय गोविंद पाटील यांची दोन महिन्याची वीज देयकाची थकबाकी असल्यामुळे त्यांना थकीत बिल भरा अन्यथा वीज खंडित करावी लागेल असे सांगितल्यावर दत्तात्रय पाटील व त्याचा मुलगा विशाल दत्तात्रय पाटील याने ह्यवीज कशी कट करतो, तुला बघतोच अशी धमकी देऊन शिवीगाळ व दमदाटी करू लागले. वीज जोडणी तोडायला त्याच्या घरासमोर असलेल्या विजेच्या खांबाकडे जात असताना दत्तात्रय पाटील याने तंत्रज्ञ संदेश खुटले यांच्या गालावर जोराने चापट मारल्याचे पोलीसांना दिलेल्या तक्रारीत संदेश यांनी म्हटले आहे. वीज चोरी मोहीम किंवा थकीत वीज देयकांची वसुलीची मोहीम राबवत असताना, महावितरण अधिकारी व कर्मचारी यांना घेराव घालण्याची ग्रामस्थांची ही नियमित सरावाची पद्धत होती. मात्र या प्रकरणांमध्ये संदेश खुटले यांनी कुठलीही माघार न घेता फौजदारी कार्यवाही करण्यावर ठाम राहीले. स्वता मारहाण करुन वीज महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांविरोधात वीजग्राहकांनी पोलीसांत विरोधात तक्रार करण्याचा प्रयत्न केला. परंतू घटनास्थळी घडलेला संपूर्ण प्रकार ध्वनी चित्रफिती मार्फत रेकॉर्ड केल्यामुळे खोटी तक्रार पोलीसांनी घेतली नसल्याकडे महावितरण कंपनीने लक्ष वेधले आहे. पनवेल तालुका पोलीस ठाण्यात वीज ग्राहक दत्तात्रय गोविंद पाटील व त्याचा मुलगा विशाल दत्तात्रय पाटील या दोघांविरुद्ध शासकीय कामात अडथळा निर्माण करण्यासाठी भारतीय दंड संहिता १८६० प्रमाणे कलम ३५३, कलम ३३२, कलम ५०४, कलम ५०६ व कलम ३४ अन्वये गुन्हा दाखल करून पनवेल तालुका पोलिस ठाणे पुढील कारवाई करत आहेत.

वसई, भाईंदर मध्ये २०२३ मध्ये एकूण ३७ हत्या; नालासोपारा येथील महिलेच्या हत्येचे गूढ कायम

■ वसई । प्रतिनिधी,

वसई विरार आणि मीरा भाईंदर शहरात २०२३ या वर्षात एकूण ३७ हत्या झाल्या. त्यापैकी ३६ हत्यांच्या उलगडा करण्यात पोलिसांना यश आले. मात्र नालासोपारा येथील महिलेच्या हत्याप्रकरणाचा अद्याप छडा लागलेला नाही. मागील ४ वर्षात शहरात एकूण १३५ हत्या झाल्या आहेत. २०२३ हे वर्ष वसई आणि भाईंदर मधील अनेक खळबळजनक हत्यांनी गाजले. शहरात २०२३ या वर्षात ३७ हत्यांचे गुन्हे दाखल झाले आहेत. २०२२ च्या तुलनेच हत्यांच्या प्रकरणात १ ने वाढ झाली आहे. त्यापैकी सर्वच्या गुन्हे उघडकीस आणण्यात यश आले आहे. गुन्हे शाखेच्या मदतीने पोलिसांनी या हत्यांचा छडा लावला आहे. मात्र नालासोपारा येथील नगिनदास पाडा येथे शीतल सावंत (२९) या महिलेच्या हत्येचा छडा अद्याप लागला नाही. तिचा लिव्ह इन पार्टनर फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. मीरा रोड मध्ये राहणाया मनोज साने या विकृत इसमाने तिची लिव्ह इन पार्टनर सरस्वती वैद्य हिची हत्या करुन तिचा मृतदेह करवतीने कापला होता. त्यानंतर ते तुकडे कुकरमध्ये शिजवले होते. चांदनी साह हत्या प्रकरण(१ डिसेंबर २०२३ पेल्हार पोलीस ठाणे) वसई पूर्वेच्या वाण्याच्या पाडा येथे राहणाया चांदनी साह या ८ वर्षीय मुलीची हत्या सरत्या वर्षाच्या शेवटी गाजली. १ डिसेंबर पासून ती बेपत्ता होती. दोन दिवसांनी तिचा मृतदेह जवळच्या चाळीतल एका रिकाम्या खोलीत आढळला होता. तिच्याच शेजारी राहणाया अल्पवयीन मुलाने तिची हत्या केली होती. याप्रकरणी मृतदेहाची विल्हेवाट लावल्याप्रकरणी मुलाच्या आई वडिलांनाही अटक करण्यात आली. नायगाव मधून एक महिन्यापासून बेपत्ता असलेल्या २९ वर्षीय नयना महंत या तरुणीची तिच्या प्रियकराने हत्या केली. मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी आरोपी प्रियकर मनोहर शुक्ला आणि त्याच्या पत्नीने सुटकेस मध्ये मृतदेह टाकून तो दुचाकीवरून गुजराथच्या वलसाड येथे नेऊन टाकला होता. यावेळी त्यांचा दोन वर्षाचा मुलगा देखील सोबत होता. नायगाव पोलिसानी पती-पत्नीला अटक केली वसईतील लॉज मध्ये गायकाची हत्या(१७ सप्टेंबर २०२३ माणिकपूर पोलीस ठाणे) वसईतील एका लॉज मध्ये उतरलेल्या हैदराबाद येथील गायकाची हत्या क्षुल्लक वादातून हत्या करण्यात आली.

नवी मुंबईत गुन्हे उकल टक्केवारीत प्रगती

■नवी मुंबई। प्रतिनिधी,

ऑनलाइन पद्धतीने फसवणूक होण्याच्या प्रकरणांत प्रचंड वाढ झाली असून सायबर पोलीस ठाण्याची निर्मिती नवी मुंबईत गेल्या वर्षी करण्यात आली. नवी मुंबईत पोलिसांना २०२३ हे वर्ष संमिश्र गेले असून गेल्या वर्षीच्या तुलनेत गुन्ह्यांची नोंद जास्त झाली असली तरी गुन्हे उकल टक्केवारीत आठ टक्क्यांनी प्रगती आहे. सन २०२२ मध्ये जानेवारी ते नोव्हेंबरदरम्यान ५ हजार ८११ विविध गुन्ह्यांची नोंद झाली होती, तर ३ हजार ७८४ गुन्ह्यांची उकल झाली होती. २०२३ मध्ये जानेवारी ते नोव्हेंबरदरम्यान ६ हजार १२८ गुन्ह्यांची नोंद, तर ४ हजार ४८० गुन्हे उकल करण्यात आले. २०२२ च्या तुलनेत २३ मध्ये गुन्ह्यांची नोंद जास्त असली तरी २०२२ मध्ये एकूण ६५ टक्के गुन्हेउकल झाली, तर यंदा हेच प्रमाण ७३ टक्के झाले आहे. शहरात आत्महत्येच्या प्रमाणात तब्बल नऊने वाढ झाली असून २०२२ मध्ये नऊ जणांनी आत्महत्या केल्या होत्या, तर २०२३ मध्ये २३ जणांनी स्वतः होऊन आपले जीवन संपवले. महिला अत्याचारात किंचित घट झाली असून २०२२ मध्ये ६८८ घटनांची नोंद झाली होती, तर २०२३ मध्ये ६८१ गुन्ह्यांची नोंद झाली आहे. आयुक्तांनी पदभार स्वीकारताच वाहतूक व्यवस्था, सायबर गुन्हेगारी आणि अमली पदार्थविरोधी कठोर कारवाईचे मनसुबे स्पष्ट केले होते. त्यानुसार ११ मे २०२३ ला आयुक्तालय क्षेत्रातील पहिले सायबर पोलीस ठाणे सुरू करण्यात आले. हे पोलीस ठाणे सुरू होताच सायबर गुन्ह्यांची उकल होणे सुरू झाले.

पाटबंधारे आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या असमन्वयामुळे पाटाच्या पाणी प्रवाहावर परिणाम

■डहाणू। प्रतिनिधी,

डहाणू नाशिक राज्य मार्गावर नुकताच नव्याने बांधण्यात आलेल्या रानशेत येथील पुलामुळे कालव्याच्या पाण्याच्या प्रवाहावर मोठा परिणाम होणार असल्याचे सांगितले जात आहे. पुलाची बांधणी करताना सार्वजनिक बांधकाम विभागाने पाटबंधारे विभागाशी समन्वय साधला नसल्यामुळे पुलाच्या बांधणीत चुका झाल्या असून यामुळे पाणी पुरवठ्यावर परिणाम होणार असल्याचे पाटबंधारे विभागाकडून सांगण्यात आले आहे. डहाणू नाशिक राज्यमार्गावर रानशेत आणि सारणी येथील १९८५ साली बांधण्यात आलेले कालव्यांवरील पुल जीर्ण झाल्यामुळे या पुलांच्या पुनर्बांधणीची गरज निर्माण झाली होती. याविषयी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पाटबंधारे विभागाशी सन २०२० पासून पत्रव्यवहार सुरू असून पाटबंधारे विभागाकडून योग्य प्रतिसाद मिळत नसल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या पुलांच्या पुनर्बांधणीसाठी निधी मंजूर करून देण्यात आला. रानशेत येथील दोन आणि सारणी येथील एक अश्या तीन पुलांसाठी १ कोटी ५६ लाख ५० हजार निधी मंजूर करण्यात आला असून डिसेंबर महिन्यात काम सुरू करण्यात आले. सारणी येथील पुलाचे काम सुरू असताना ५ डिसेंबर आणि २१ डिसेंबर रोजी पाटबंधारे विभागाने पत्राद्वारे पुलाची बांधणी चुकीची होत असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निदर्शनास आणून दिले. मात्र याकडे दुर्लक्ष करून सार्वजनिक बांधकाम विभागाने पुलाचे काम पूर्ण केले असून यामुळे पाण्याच्या प्रवाहावर मोठा परिणाम होणार असल्याची माहिती पाटबंधारे विभागाकडून देण्यात येत आहे. यापूर्वीच्या पुलाची रुंदी खालील भागात ५.८ मिटर असून नव्याने बांधण्यात आलेल्या पुलांची रुंदी खालच्या टोकाला ३.८ मिटर आहे. यामुळे पुलाची रुंदी कमी झाली असून पाण्याच्या प्रवाहावर मोठा परिणाम होऊन फुगवट्या मुळे मागील भागातील कालव्यांचे देखील नुकसान होण्याची भीती वर्तवली जात आहे. तसेच शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहचवण्यात अडचणी निर्माण होऊन शेतकऱ्यांना पुरेसा पाणी पुरवठा करता येणार नाही. परिणामी उन्हाळी शेतीवर याचा मोठा परिणाम होणार असून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार आहे. सारणी येथील नवीन पुलामुळे पाणी प्रवाहात अडथळे निर्माण झाले असून यामुळे पाण्याच्या प्रवाहावर मोठा परिणाम होणार आहे. पुलं बांधतांना सार्वजनिक बांधकाम विभागाला पत्राद्वारे सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र त्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे पाणी प्रवाहात अडसर निर्माण झाले आहेत. याविषयी सार्वजनिक बांधकाम विभागाला सूचना देण्यात आल्या असून पाण्याचा प्रवाह पूर्ववत करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी पाटबंधारे विभागाला कळवले आहे. - योगेश पाटील, कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग पालघर हाणू तालुक्यातील राज्य मार्गावर कालव्यांवरील एकूण सहा पुल जीर्ण झाले असून याविषयी पाटबंधारे विभागाशी २०२० पासून पत्रव्यवहार सुरू आहे. मात्र त्यांच्याकडून योग्य सहकार्य मिळत नसल्यामुळे आम्ही आमच्या स्तरावरून पुलांसाठी निधी मंजूर करून आणला असून कामे सुरू केली आहेत.

काटई-बदलापूर रस्त्यावर वाहन चालकाला लुटले; वाहनासह चोरटे फरार

■डोंबिवली। प्रतिनिधी,

काटई-बदलापूर रस्त्यावर रविवारी दुपारी तीन जणांनी एका वाहन चालकाला पलावा-खोणी भागात अडविले. आम्हाला वाशी येथे जायचे आहे असे सांगून त्याच्या वाहनात जबरदस्तीने बसले. वाहन चालकाला चाकूचा धाक दाखवून त्याच्या जवळील रोख रक्कम काढून घेतली. चालकाला जबरदस्तीने वाहनातून ढकलून देऊन चोरटे वाहनासह फरार झाले. सचीन शाव (२०) असे वाहन चालकाचे नाव आहे. चालकाने मानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. पोलिसांनी सांगितले, सचीन हे त्यांच्या मोटारीने काटई-बदलापूर रस्त्याने रविवारी दुपारच्या वेळेत चालले होते. पलावा-खोणी भागातून जात असताना सचीन यांना तीन जणांनी हात दाखवून थांबविले. आम्हाला वाशी येथे जायचे आहे, असे बोलून ते जबरदस्तीने वाहनात बसले. मी वाशी येथे जात नाही, असे सांगूनही त्यांनी जबरदस्तीने वाहनाचा ताबा घेतला. वाहनात बसल्यावर एकाने चाकूचा धाक चालक सचीनला दाखविला. जास्त आवाज केला तर तुला बघून घेऊ, अशी धमकी दिली. सचीन आपल्या मोटीराचा ताबा सोडण्यास तयार नसल्याने तिघा चोरट्यांनी सचीन यांना मोटारीत मारहाण केली. एकाने चोरट्याने सचीनला वाहनातून जबरदस्तीने उतरवून स्वता वाहनाचा ताबा घेतला. तिघे चोरेट सचीन जवळील दीड हजार रुपए रक्कम आणि त्याची मोटार असा एकूण २ लाखाहून अधिकचा ऐवज घेऊन पसार झाले. मानपाडा पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

शहराचे कारभारी पाठविणारे तुम्ही कोण? गणेश नाईकांच्या प्रश्नामुळे नवी मुंबईतील सत्तासंघर्ष उघड

■नवी मुंबई। प्रतिनिधी,

राज्य सरकारकडून महापालिकेत प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यांच्या संख्येविषयी थेट प्रश्न उपस्थित करताना आमच्या शहराचे कारभारी पाठविणारे तुम्ही कोण असा थेट सवाल केला. गेली ४० वर्षे आम्ही या शहराची सेवा करतो. आमच्या शहरात काय घडावे हे ठरविणारे तुम्ही कोण असा सवाल करताना गणेश नाईक यांनी अप्रत्यक्षपणे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाच लक्ष्य केल्याची चर्चा आता रंगली आहे. वाशीतील भावे नाट्यगृहात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. महाविकास आघाडीचे सरकार अस्तित्वात आल्यापासून विरोधकाच्या भूमिकेत शिरलेले नवी मुंबईतील भाजपचे नेते आणि माजी मंत्री गणेश नाईक यांनी राज्यातील नव्या सत्ता बदलानंतरही संघर्षाची आपली भूमिका कायम ठेवली असून नवी मुंबई महापालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात नाईकांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अखत्यारीत येणाऱ्या नगरविकास विभागाच्या काही निर्णयांवर अप्रत्यक्षपणे सवाल उपस्थित केल्याने ठाणे आणि नवी मुंबईतील हा सत्तासंघर्ष अजूनही कायम असल्याची चर्चा येथील राजकीय वतुर्ळात सुरू झाली आहे.

अधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांवर प्रश्नांची सरबत्ती करत असताना नाईकांनी यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा दोष नाही अशी सारवासारवही केली, मात्र त्यांच्या प्रश्नांचा रोख थेट नगरविकास विभागावर असल्याने हा छुपा संघर्ष मात्र लपून राहिला नाही.

अधिकाऱ्यांची नियुक्ती करताना भान ठेवा

राज्यात महाविकास आघाडीचे सरकार अस्तित्वात आल्यापासून अजब फतवे निघू लागले. नवी मुंबई महापालिकेत एकेकाळी अर्धे अधिकारी हे प्रतिनियुक्तीवर असायचे तर अर्धे हे कायम सेवेतील असायचे. महापालिकेत कायम असलेल्या अधिकाऱ्यांना शहराची खडानखडा माहिती असते. २०१९ नंतर मात्र अधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांचे हे प्रमाण पाळले गेले नाही.

वाघोलीत शाळकरी मुलीचा वडिलांकडून खून

■पुणे। प्रतिनिधी,

नगर रस्त्यावरील वाघोलीमध्ये शाळकरी मुलीचा वडिलांनीच कुऱ्हाडीने वार करून खून केल्याची घटना घडली.

घटनेनंतर वडील पसार झाले असून, त्यांच्याविरुद्ध लोणीकंद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कौटुंबिक वादातून वडिलांनी मुलीचा खून केल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. अक्षता फकिरा दुपारगुडे (वय १५, सध्या रा. वाघोली, मूळ रा. सोलापूर) असे खून झालेल्या मुलीचे नाव आहे.

उपचारासाठी तिला ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तिच्या काकाने याबाबत पोलिसांकडे फिर्याद दिली आहे. अक्षताचे वडील बांधकाम मजूर आहेत. आई गृहिणी आहे. ती वाघोलीतील एका शाळेत शिकते. अक्षताची आई घरकामासाठी सकाळी बाहेर पडली. त्यावेळी वडिलांनी तिच्याशी वाद घालण्यास सुरुवात केली. रागाच्या भरात वडिलांनी तिच्यावर कुऱ्हाडीने वार केले. या घटनेत ती गंभीर जखमी झाली होती.

या घटनेची माहिती मिळाल्यानंतर नातेवाईक आणि रहिवाशांनी तिला तातडीने ससून रुग्णालयात दाखल केले. लोणीकंद पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजित काइंगडे यांनी घटनास्थळी भेट दिली. मुलीचा खून करून वडील पसार झाले. त्यांच्या शोधासाठी पोलिसांची पथके रवाना झाली आहेत. लोणीकंद पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घरफोडी करणाऱ्या चोराचा दाम्पत्यावर प्राणघातक हल्ला

■मुंबई। प्रतिनिधी,

घरफोडी करण्यासाठी घरात घुसलेल्या चोराने दाम्पत्यावर प्राणघातक हल्ला केल्याची घटना बुधवारी पहाटे गोवंडी परिसरात घडली. याप्रकरणी गोवंडी पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली.

गोवंडी गावात बुधवारी पहाटे २ च्या सुमारास ही घटना घडली. गोवंडी गावात वास्तव्यास असलेल्या ऐश्वर्या पिसे कुटुंबियांसोबत घरात निद्रीस्त होत्या. अचानक त्यांच्या घरात एक चोर शिरला. ही बाब ऐश्वर्या यांच्या लक्षात येताच त्यांनी पतीला उठवले आणि घरात चोर शिरल्याची माहिती दिली. याच वेळी चोराने या पिसे दाम्पत्यावर प्राणघातक हल्ला केला. त्यात पिसे दाम्पत्य गंभीर जखमी झाले.

ऐश्वर्या यांनी आरडाओरडा केल्यानंतर शेजाऱ्यांनी त्यांच्या घराकडे धाव घेतली आणि आरोपीला पकडले. त्यानंतर त्याला गोवंडी पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. गोवंडी पोलिसांनी याबाबत गुन्हा दाखल करून आरोपी अरविंद देशमुखला अटक केली.

भूभाड्याच्या बनावट पावतीद्वारे म्हाडाच्या रहिवाशांची फसवणूक; म्हाडाच्या मुंबई मंडळातील कर्मचाऱ्याचा प्रताप

■मुंबई। प्रतिनिधी,

म्हाडाच्या कोकण मंडळातील एका भाडेवसुलीकाराने वसूल केलेली सेवाशुल्काची रक्कम म्हाडाच्या तिजोरीत जमा न करता परस्पर लाटल्याचे प्रकरण ताजे असतानाच आता मुंबई मंडळातील एका कर्मचाऱ्याने केलेला अपहार निदर्शनास आला आहे. मुंबई मंडळाच्या जागतिक बँक प्रकल्पातील भाडेवसुलीकाराने भूभाड्याची बनावट पावती पुस्तिका तयार करून रहिवाशांकडून शुल्कापोटी वसूल केलेल्या लाखो रुपयांच्या रकमेचा अपहार केल्याचे उघडकीस आले आहे. याप्रकरणी जागतिक बँक प्रकल्पातील मिळकत व्यवस्थापकाने बोरिवली पोलीस ठाण्यात पोलीस तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीनुसार संबंधित कर्मचाऱ्याविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून मुंबई मंडळाने या कर्मचाऱ्याला निलंबित केले आहे.

जागतिक बँक प्रकल्पाअंतर्गत आकुर्ली, चारकोप, कांदिवली, गोराई, मालवणी, मुलुंड आदी ठिकाणी वसाहती आहेत. या वसाहतीतील रहिवाशांकडून भूभाडे वसूल करण्याची जबाबदारी भाडे वसुलीकारावर सोपविण्यात आली आहे. भाडेवसूलीकार बाबू बालान्ना म्यातरी भूभाडे वसुलीचे काम करीत होता. म्यातरीने भूभाडे वसूल केल्यानंतर दिलेल्या पावत्या बनावट असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर याप्रकरणी चौकशी केली असता म्यातरी मागील काही वर्षांपासून भूभाड्याच्या बनावट पावत्या देऊन रहिवाशांकडून अतिरिक्त भूभाडे वसूल करीत असल्याचे निदर्शनास आले. बनावट पावत्या देऊन त्याने म्हाडा आणि रहिवाशांची फसवणूक केल्याचे स्पष्ट झाले. यानंतर पुढील प्रक्रिया पूर्ण करून म्यातरीविरोधात बोरिवली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आल्याची माहिती जागतिक बँक प्रकल्पातील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया पोलीस करीत आहेत. या कर्मचाऱ्याला निलंबित करण्यात आले असून लवकरच त्याच्याविरोधात बडतफीर्ची कारवाई करण्यात येणार असल्याचेही या अधिकाऱ्याने सांगितले.

बनावट पावत्याच्या आधारे अनेक रहिवाशांकडून भूभाडे वसूल करण्यात आले आहे. आपली भूभाडे पावती बनावट असेल तर पुढे काय असा प्रश्न या रहिवाशांना पडला आहे. पावती बनावट असल्याचे आढळल्यास आर्थिक भुर्दंड सोसावा लागण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

मुंबईतील चित्रपटगृहे, नाट्यगृहे यांच्या रंगभूमी करात वाढ; राज्य सरकारच्या मंजुरीनंतर अंमलबजावणी

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबईतील चित्रपटगृहे, नाट्यगृहे, सर्कस, आनंदबाजार यांचे प्रयोग व खेळ यांच्यावरील रंगभूमी करात वाढ करण्याचे पालिका प्रशासनाने ठरवले आहे. गेल्या १३ वर्षांत ही करवाढ करण्यात आली नव्हती. २०२४-२५ या वर्षासाठीच हे नवीन कर प्रस्तावित करण्यात आले असून राज्य सरकारने मंजुरी दिल्यावर हे कर लागू होतील. चित्रपट, नाटक, सर्कस, आनंदबाजार यांचे प्रयोग व खेळ यांच्यावर रंगभूमी कर आकारण्याचे अधिकार मुंबई महापालिकेला आहेत. मराठी व गुजराती नाटके, चित्रपट, एकपात्री नाट्यप्रयोग, तमाशा यांना या रंगभूमीकराच्या अधिदानातून माफीची सवलत असते. २०१० मधील दरानुसार सध्या हे कर आकारले जात आहेत. त्यामुळे प्रत्येक खेळामागे ५० ते ६० रुपये आकारले जात आहेत.

या कराच्या दरात दरवर्षी १० टक्के वाढ करावी, असा प्रस्ताव महासभेत २०१५ मध्ये मंजूर झाला होता. मात्र त्याला राज्य सरकारने अद्याप मंजुरी दिली नसल्यामुळे जुनेच दर आकारले जात आहे. मात्र त्यात आता वाढ करण्याचा निर्णय करनिर्धारण व संकलक विभागाने घेतला आहे. ही करवाढ लागू झाल्यास पालिकेला वार्षिक १० कोटींचा महसूल मिळणार आहे.

पुष्पा चित्रपटाप्रमाणे धुळे जिल्ह्यात बनावट देशी दारुची वाहतूक, तीन लाखाचा मुद्देमाल हस्तगत

■धुळे। प्रतिनिधी,

पुष्पा या अलु अर्जुनच्या गाजलेल्या दाक्षिणात्य चित्रपटात ज्याप्रमाणे चंदनाची वाहतूक मालवाहू वाहनातून छुप्या पध्दतीने केली जाते, त्या पद्धतीनुसार मालवाहू वाहनाच्या तळाशी चोरकप्पा तयार करून बेमालूमपणे होणारी बनावट देशी दारूची वाहतूक धुळे जिल्ह्यात पोलिसांनी उघड केली आहे.

या कारवाईत तीन लाख दोन हजार ४४० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून चौघा संशयितांविरुद्ध चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे यांना मिळालेल्या माहितीवरून जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी चाळीसगाव रस्त्यावरील जामचा मळा भागात छापा टाकून बनावट देशी दारू वाहून नेणारे वाहन पकडण्यात आले. मालवाहू वाहनाच्या तळाशी उघडझाप करणारा पत्र्याचा कप्पा बनवून त्यात संशयित नारायण माळी (रा. शिरपूर), श्रीराम बाबर, महेंद्र चौधरी (दोन्ही रा.साक्री) यांनी जवळपास ९७ हजार रुपयांची बनावट देशी दारू ठेवल्याचे आढळले. पोलिसांनी चंद्रप्रकाश पाटील (रा.पद्मनाभ नगर,मोगलाई, धुळे) याची आधी चौकशी केल्यावर ही चोरटी वाहतूक उघड झाली. कुठलेही अधिकृत कागदपत्र नसताना आणि परवाना नसताना संशयितांनी ही दारू विक्री करण्याच्या उद्देशाने वाहनात चोरून ठेवली होती.

पोलिसांनी या कारवाईत ९७ हजार रुपयांची बनावट दारू, पाच हजार रुपयांचा भ्रमणध्वनी आणि दोन लाख रुपयांचे वाहन असा तीन लाख दोन हजार ४४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून चारही संशयितांविरुद्ध चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

महिला व बालकल्याण सभापती अवंतिका लेकुरवाळेंवर गुन्हा

■नागपूर। प्रतिनिधी,

टिप्परच्या धडकेत दोन भावंडाचा मृत्यू झाला. त्यानंतर जिल्हा परिषदेच्या महिला व बाल कल्याण सभापती अवंतिका लेकुरवाळे, पती रमेश लेकुरवाळे, कामठी पंचायत समितीचे माजी उपसभापती आशिष मल्लेवार यांच्या नेतृत्वात ३७ कार्यकर्त्यांनी टिप्परला आग लावली, अग्निशमन दलाच्या वाहनावर दगडफेक केली आणि बेकायदेशिररित्या गर्दी जमा करण्यासह अन्य गुन्हे दाखल करण्यात आले.

२९ डिसेंबरला सकाळी बिडगावजवळ सायकलने जात असलेले सुमित नन्हेलाल सैनी (१५, रा. दुर्गानगर, पारडी) आणि बहिण अंजली सैनी (१८) यांना एका भरधाव टिप्परने धडक दिली. या धडकेत दोघेही भावंड जागीच ठार झाली. या घटनेनंतर या ठिकाणी मोठी गर्दी जमा झाली. जिल्हा परिषदेच्या पदाधिकारी अवंतिका लेकुरवाळे यांनी स्पिकर आणि माईकवरून नागरिकांना चिथावणी दिली. नागरिकांना टिप्पर जाळण्यासाठी प्रवृत्त केले.

तसेच अग्निशमन दलाच्या जवानावर दगडफेक करीत शासकीय कामात अडथळा निर्माण केला. त्यामुळे पोलिसांना लाठीमार करावा लागला होता. टिप्पर चालक बादशहा ठाकूर यालाही नागरिकांनी मारहाण केली होती.

निराधार महिलेच्या डोक्यातील जखमेत अळ्या, मेडिकलमध्ये डॉक्टरांनी...

■नागपूर। प्रतिनिधी,

कडाक्याच्या थंडीत गणेशपेठ पोलिसांना एक ४५ वर्षीय महिला जखमी अवस्थेत आढळली. तिच्या डोक्यातील जखमेत अळ्या पडल्या होत्या. पोलिसांनी तिला मेडिकल रुग्णालयात दाखल केले. मेडिकलच्या डॉक्टरांनी तिच्यावर उपचार करत जीवदान दिले. गणेशपेठ भागात २९ ऑगस्ट २०२३ रोजी ४५ वर्षीय निराधार महिला वनवन भटकताना आढळली. तिच्या डोक्याला मोठी जखम होऊन त्यात अळ्या पडल्या होत्या. त्या जखमेतून दुर्गंधी येत होती. मेडिकलच्या शल्यक्रिया विभागाच्या आकस्मिक विभागात रुग्णावर डॉ. ब्रिजेश गुप्ता, डॉ. सुबोध, डॉ. शिखा यांनी उपचार सुरू केला.

रुग्णावर तब्बल तीन महिने उपचार झाले. माजी वैद्यकीय अधीक्षक डॉ. शरद कुचेवार यांनी स्वतः वैयक्तिक लक्ष घालून, रुग्णास भेटी देऊन उपचारास आवश्यक ती मदत पुरवली. रुग्णात हळूहळू सुधारणा होत गेली, त्यानंतर डोक्यावर प्लास्टिक सर्जरी करून उपचार करण्याकरिता प्लास्टिक सर्जरीला पाठवण्यात आले. परंतु, रुग्ण उपचारासाठी प्रतिसाद देत नव्हती. त्यावर वैद्यकीय अधीक्षक डॉ. अविनाश गावंडे यांनी रुग्णांस स्वतः भेट देऊन समुपदेशन केले.

समाजसेवा विभागाकडून मदत

सदर रुग्णावर उपचारादरम्यान समाजसेवा विभागामार्फत सातत्याने भेटी देत बोलके करण्यात आले. रुग्णाने स्वतःचे नाव साहिबा प्रधान रा. बेलदा बाजार, जिल्हा- मेदनापूर, पश्चिम बंगाल अशी तुटक-तुटक माहिती दिली. त्या आधारावर पोलीस अधीक्षक कार्यालय मेदनापूर यांच्याशी संपर्क करून नातेवाईकांचा शोध घेण्याचा प्रयत्न झाला. परंतु, नातेवाईक आढळले नाही. शेवटी मिशनरी ऑफ चॅरिटी मदर तेरेसाज होम, शांती भवन, काटोल रोड, नागपूर येथे रुग्णाची सोय केली गेली. अधिष्ठाता डॉ. राज गजभिये यांनीही वेळोवेळी रुग्णाला मदत केली.

प्लाझालगतचा पदपथ पुन्हा अस्वच्छ; घनकचरा विभागाची भाजी विक्रेत्यांवर दंडात्मक कारवाई

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबई महानगरपालिकेच्या जी उत्तर विभागाने दादरमधील प्लाझा चित्रपटगृहालगतच्या पदपथावर स्वच्छता मोहीम राबविली होती. मात्र दुसऱ्याच दिवशी पुन्हा एकदा या पदपथावर भाज्यांच्या कचऱ्याचा खच पडला आणि मातीमुळे पादचाऱ्यांना चिखल तुडवत वाट काढावी लागली. त्यामुळे जी उत्तर विभागामधील घन कचरा व्यवस्थापन विभागातील अधिकाऱ्यांनी येथील भाजी विक्रेत्यांवर दंडात्मक कारवाईचा बडगा उगारला आहे.

एका दिवसात कारवाईदरम्यान २६ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला. तसेच पदपथ अस्वच्छ करणाऱ्या भाजीविक्रेत्यां समज देण्यात आली.

दादर पश्चिम परिसरात लोकमान्य टिळक पूल जिथे उतरतो तिथे कोतवाल उद्यानाच्या आजूबाजूला आणि प्लाझा चित्रपटगृहालगतच्या पदपथावर दररोज भाज्यांचा कचरा, भाज्यांच्या मुळांना लागलेली माती पडलेली असते. दादरच्या बाजारातील भाजी विक्रेते रोज सकाळी बाहेरगावाहून येणाऱ्या भाज्या इथे उतरवून घेतात. त्यामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याला व अस्वच्छतेला आळा घालण्यासाठी पालिकेच्या जी उत्तर विभागाने दोनच दिवसांपूर्वी एक मोहीम हाती घेतली होती. त्यात भाजी विक्रेत्यांनाही समाविष्ट करून घेतले होते. तसेच त्यांना स्वच्छतेविषयी जाणीव व जागरूक करण्याची अनोखी मोहीम राबविण्यात आली होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निदेर्शानुसार पालिका प्रशासनाने सध्या मोठ्या प्रमाणावर मुंबईत स्वच्छता मोहीम हाती घेतली आहे. मुंबईत विविध ठिकाणी स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली आहे. त्याचाच एक भाग म्हणून जी उत्तर विभागाने दादरच्या प्लाझा परिसरात एक मोठी मोहीम हाती घेतली होती.

दादर स्थानक परिसर भाजी आणि फूल विक्रेत्यांसाठी मोठा बाजार आहे. रोज पहाटे या ठिकाणी मुंबईच्या बाहेरून मोठ्या प्रमाणावर घाऊक प्रमाणावर भाज्या आणि फूले आणली जातात. लहान व्यापारी ते विकत घेतात आणि ठिकठिकाणी नेऊन विकतात. भाज्यांच्या उतरवताना होणारा कचरा, माती यामुळे स्थानकाजवळचे रस्ते विशेषतः प्लाझा येथे टिळक पुलाच्या पदपथावर जाड चिखलाचे थर साठतात.

पुणेकरांना खुशखबर! मेट्रो लवकरच रामवाडीपर्यंत धावणार

■पुणे। प्रतिनिधी,

पुणे मेट्रोची रुबी हॉल ते रामवाडी या मार्गावरील सेवा मागील वर्षाच्या अखेरीस सुरू होणे अपेक्षित होते. परंतु, त्यासाठी आता नवीन वर्ष उजाडले आहे. या मागार्चे काम पूर्ण होत आले असून, मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांचे पथक या आठवड्यात तपासणीसाठी येत आहे. या पथकाकडून आठवडाभर या मागार्ची तपासणी होणार आहे. त्यानंतर खुद्द आयुक्त येऊन पाहणी करणार आहेत.

मागील वर्षाच्या अखेरीस रुबी हॉल ते रामवाडी या विस्तारित मागार्ची मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांकडून तपासणी आणि त्यांची मंजुरी घेण्याचा महामेट्रोचा प्रयत्न होता. या गोष्टी मागील वर्षात पूर्ण करून नवीन वर्षाच्या सुरुवातीला विस्तारित मार्ग सुरू करण्याचे महामेट्रोचे नियोजन होते. मात्र, या मार्गावरील येरवडा स्थानकाचे जिने नगर रस्त्यावर येत होते. महामेट्रोकडून या जिन्यांसाठी खांब उभारणीचे काम सुरू करण्यात आले होते. परंतु, स्थानिक नागरिकांनी वाहतूककोंडी होत असल्याने या कामाला विरोध केला. अखेर महापालिकेने हे जिने दुसरीकडे हलविण्यास महामेट्रोला सांगितले.

महापालिकेने सांगितल्यानुसार महामेट्रोने येरवडा स्थानकाच्या प्रवेशद्वाराच्या रचनेत काही बदल केले. या बदलामुळे येरवडा स्थानकाच्या जिन्याचे काही खांब पाडण्याची वेळ महामेट्रोवर आली. आता ते नव्याने उभारण्यात येत आहेत. यामुळे मेट्रोकडून काम पूर्ण होण्यास विलंब झाला. आता काम पूर्ण होत आले असून, मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांचे पथक या आठवड्यात पुण्यात दाखल होत आहे. पथक विस्तारित मागार्ची आठवडाभर तपासणी करणार आहे. या पथकाकडून आयुक्तांकडे अहवाल सादर केला जाईल. त्यानंतर आयुक्त प्रत्यक्ष येऊन या मागार्ची तपासणी करतील. आयुक्तांनी या मागार्ला हिरवा कंदील दिल्यानंतर महामेट्रोकडून मार्ग सुरू करण्याबाबत राज्य सरकारला पत्रव्यवहार केला जाईल. त्यानंतर राज्य सरकार मार्ग सुरू करण्याचा अंतिम निर्णय घेईल, अशी माहिती महामेट्रोतील सूत्रांनी दिली.

स्वारगेटपर्यंतच्या टप्प्याला विलंब

जिल्हा न्यायालय ते स्वारगेट हा भुयारी मार्ग आहे. या मार्गावर बुधवार पेठ, मंडई आणि स्वारगेट ही तीन स्थानके आहे. या मागार्चे काम पूर्ण झाले असले तरी तिन्ही स्थानकांचे काम सध्या सुरू आहे. ही स्थानके भुयारी असल्याने त्यांच्या कामाला विलंब लागत आहे. हे काम मार्चअखेरपर्यंत पूर्ण होईल, अशी माहिती सूत्रांनी दिली.

भिवंडीत कत्तल केलेल्या म्हैस आणि रेड्याच्या चरबीपासून बनावट तूप

■ठाणे। प्रतिनिधी,

भिवंडीत कत्तल केलेल्या म्हैशी आणि रेड्यांचे अवशेष आणून त्यामधील चरबी वितळवून बनावट तूप बनविण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. हे तूप मोठ्या खानावळी, उपाहारगृहांना विक्री केला जात होता. महापालिकेने बनावट तुपाचे १५ किलो वजनाचे २० डबे आणि कढई असे साहित्य जप्त केले आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल केला जाणार असल्याची माहिती भिवंडी महापालिका प्रशासनाने दिली. भिवंडी येथील भोईवाडा भागात इदगाह साल्टर हाऊस हा बंद कत्तलखाना आहे.

या कत्तलखान्यात कापण्यात आलेले म्हैस आणि रेड्यांचे उरलेले अवशेष टाकले जाते. हे अवशेष गोळा करून त्यामधील चरबी काढून ती सुकविली जात होती. तसेच त्यापासून तूप बनविले जात असल्याच्या तक्रारी भिवंडी महापालिका प्रशासनाला प्राप्त झाल्या होत्या. या माहितीच्या आधारे, महापालिका आयुक्त अजय वैद्य यांच्या आदेशाने पर्यावरण विभागाचे नियंत्रण अधिकारी सुदाम जाधव यांचे पथक आणि आपत्कालीन विभागाच्या पथकाने घटनास्थळी धाड मारली.

कारवाई दरम्यान तेथे तूप कढविण्याची भट्टी सुरू असल्याचे आढळून आले. पालिका कर्मचाऱ्यांनी कढई मधील साहित्य ओतले. तसेच बनावट तुपाचे १५ किलो वजनाचे २० डबे आणि कढई असे साहित्य जप्त केले आहे.

नांदगाव तालुक्यात शस्त्रांसह तिघे ताब्यात

■नाशिक। प्रतिनिधी,

शस्त्रसाठा घेऊन फिरणाऱ्या तीन जणांविरुध्द नांदगाव पोलिसांनी कारवाई करुन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. नांदगाव तालुक्यातील कोंढार शिवारात संशयितरित्या एक वाहन फिरत असल्याची माहिती पोलीस निरीक्षक प्रीतम चौधरी यांना मिळाली असता चौधरी पथकासह रवाना झाले. पोलिसांनी संशयित वाहनाचा पाठलाग करून कोंढार शिवारात ते अडवले. वाहनाची झडती घेतली असता बंदूक, २३ जिवंत पितळी राऊंड, दोन रिकाम्या पुंगळ्या, कोयते, चाकू, कुऱ्हाड, दुर्बीण, सर्चलाईट आदी साहित्य आढळून आले. संशयितांना ताब्यात घेऊन तपास करण्यात आला. तपासात संशयितांच्या घरीदेखील हत्यारे असल्याचे समजले. निरीक्षक चौधरी यांनी मालेगाव येथे संशयितांच्या घरांची झडती घेतली असता, छऱ्याची बंदूक आणि इतर हत्यारे सापडले. शेख इरफान, अफजल अहमद, अन्सारी मोहंमद या तिघांविरुध्द नांदगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यात सोनसाखळी चोरणारी टोळी गजाआड

■पुणे। प्रतिनिधी,

भीमा कोरेगाव येथील विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यात आंबेडकरी चळवळीतील अनुयायांच्या गळ्यातील सोनसाखळी चोरणाऱ्या टोळीला लोणीकंद पोलिसांनी गजाआड केले. याप्रकरणी पोलिसांनी महिलेसह सात जणांना अटक केली आहे.

अरुणा किशन गायकवाड (वय ४०, रा. नुराणी गल्ली, ता. जामखेड, जि. अहमदनगर), ऋषीकेश बंडू जाधव (वय २२, रा. गांधीनगर, नूर कॉलनी, बीड), अनिल उत्तम पवार (वय २२, रा. नवगण राजुरी, जि. बीड), सचिन श्रीमंत गुंजाळ (वय ३५, रा. खडक देवळा, जि. बीड), शंकर सजेर्राव गायकवाड (वय ३४, रा. नाळवंडी नाका, जि. बीड), मिलिंद वसंत शिंदे (वय २०, रा. शताब्दीनगर, छत्रपती संभाजीनगर), नितेश रमेशराव बोधणकर (वय ३४, रा. पिंपळगाव, जि. अमरावती) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. भीमा कोरेगाव येथील विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी सोमवारी (१ जानेवारी) राज्यभरातून आंबेडकरी चळवळीतील अनुयायांनी गर्दी केली होती. पेरणे फाटा परिसरात बसमध्ये प्रवेश करणाऱ्या अनुनायांच्या गळ्यातील दागिने चोरीला गेल्याच्या तक्रारी पोलिसांकडे आल्या होत्या. पोलिसांनी तपास करून सातजणांना अटक केली. न्यायालयाने आरोपींना शुक्रवारपर्यंत (५ जानेवारी) पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. लोणीकंद पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक रवींद्र गोडसे, गजानन जाधव, शिरीष भालेराव यांनी ही कारवाई केली.